



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com







# शेतकरी, पशूपालक आणि मच्छीमार भाऊ-बहिणींच्या हिताशी तडजोड नाही

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं डोनाल्ड ट्रम्प यांना प्रत्युत्तर





**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** आमच्यासाठी, आमच्या शेतकऱ्यांचे कल्याण हे आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे. भारत आपल्या शेतकरी, पशुपालक आणि मच्छीमारांच्या हिताशी कधीही तडजोड करणार नाही. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, शेतीवरील खर्च कमी करणे, उत्पन्नाचे नवीन स्रोत निर्माण करणे, या ध्येयांवर आम्ही सतत काम करत आहोत. डोनाल्ड ट्रम्प यांच्या भारतावर कर लावल्याच्या निर्णयानंतर भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्रम्प यांना प्रत्युत्तर दिलं आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अखेर आपली धमकी खरी करून दाखवली आहे. भारतावर अतिरिक्त २५ टक्के कर लादण्याच्या कार्यकारी आदेशावर डोनाल्ड ट्रम्प यांनी स्वाक्षरी केली. ही करवाढ २१ दिवसांनंतर म्हणजेच २७ ऑगस्टपासून लागू होईल. रशियाकडून तेल खरेदीमुळे भारतावर ही कारवाई करण्यात आल्याचं आदेशात म्हटलंय. २५ टक्के अतिरिक्त करामुळे अमेरिकेचा भारतावर एकूण आयातकर ५० टक्के झाला आहे.

भारत सरकारने रशियाचंच उदाहरण देत ट्रम्प यांना प्रत्युत्तर दिलं होतं. ज्या रशियाचं नाव घेऊन डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताला धमकावलं आहे, त्याच रशियाकडून अमेरिका व युरोपियन युनियन कच्चा माल आयात करत असल्याचा दाखला भारतानं दिला आहे. युक्रेन युद्ध सुरू झाल्यापासून अमेरिका व युरोपियन राष्ट्रे रशियाकडून तेल आयात करतो म्हणून भारतावर सातत्याने टीका करत आहेत. पण युक्रेन युद्ध सुरू झाल्यापासून तेलाचे उपलब्ध पुरवठा पर्याय हे युरोपकडे वळवण्यात आले. त्यामुळेच भारतानं रशियाकडून तेल आयात करायला सुरुवात केली, असं भारताकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

## भारत-पाकिस्तानचा सामना रद्द

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** आशिया चषक हॉकी २०२५ ची स्पर्धा २७ ऑगस्ट ते ७ सप्टेंबरपर्यंत खेळवण्यात येणार आहे. ही स्पर्धा भारतातील बिहारच्या राजगीरमध्ये आयोजित करण्यात आली आहे. भारतात येऊन हॉकीचा सामना खेळण्यासाठीयेण्यासपाकिस्तानच्या संघाने नकार दिल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे भारत आणि पाकिस्तान यांच्यातील हॉकीचा सामना रद्द होणार असल्याचे जवळपास निश्चित झाले आहे.

आशिया चषक हॉकीच्या स्पर्धेत भारत आणि पाकिस्तानसह एकूण ८ संघांचा समावेश होता. परंतु आता पाकिस्तानच्या हॉकी संघाने भारतात येण्यास नकार दिला आहे. पाकिस्तानच्या या निर्णयानंतर भारताच्या हॉकी व्यावस्थापनाने दुसऱ्या देशाला आशिया चषकाच्या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आमंत्रण दिले आहे. दरम्यान, या स्पर्धेत जेतेपद पटकावणार संघ नेदरलँड आणि बेल्जियममध्ये होणाऱ्या हॉकी विश्वचषक २०२६ च्या स्पर्धेसाठी पात्र ठरेल.

## उत्तरकाशीमध्ये महाराष्ट्रातील १५१ पर्यटक अडकल्याचा अंदाज; मंत्री गिरीश महाजन उत्तराखंडसाठी रवाना

**मुंबई (प्रतिनिधी)–** उत्तराखंड राज्यातील उत्तरकाशी जिल्ह्यातील धराली परिसरात मुसळधार पाऊस व ढगफुटी झाल्याने मोठी दुर्घटना घडली आहे. अवघ्या ३४ सेकंदाच्या ढगफुटीनंतर धारली गाव ढिगाऱ्याखाली गाडलं गेलं. दरम्यान या घटनेत१५० हून अधिक लोक गाडले गेले असावेत, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे, असे असताना महाराष्ट्रातील १५० हून अधिक पर्यटक या दुर्घटनेत अडकल्याचीहि भीती व्यक्त केली जात आहे. परिणामी राज्याचे आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन हे उत्तराखंडसाठी रवाना झाले आहेत.



उत्तरकाशीमध्ये महाराष्ट्रातील जवळपास १५१ पर्यटक अडकले आहेत. राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून मिळालेल्या माहितीनुसार, सगळे पर्यटक सुखरूप आहेत. आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून अनेकांशी संपर्क साधण्यात आला आहे. १५१ पैकी जवळपास साठ पर्यटक अनुमान आश्रम इथे सुरक्षित आहेत. तर काहींचे लोकेशन्स ट्रेस करण्याचा प्रयत्न केला जात आहे. उत्तराखंड राज्यातील उत्तरकाशी जिल्ह्यातील धराली परिसरात ढगफुटीमुळे खीर गंगा नदीला मोठा पूर आला. या दुर्घटनेत काहींचा मृत्यू झाला असून अनेक घरांचे नुकसान झाले आहे. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील पर्यटक या दुर्घटनेमुळे उत्तरकाशीमध्ये अडकले आहेत. राज्य आपत्कालीन कार्य केंद्राने सांगितले की, सगळे पर्यटक सुखरूप असल्याची माहिती राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून देण्यात आली आहे. बचावकार्य वेगाने सुरू आहे.

उत्तरकाशीमध्ये आलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे मालेगावातील सात भाविकांशी कालपासून संपर्क तुटला आहे. ही सर्व भाविक मंडळी गंगोत्रीहून उत्तरकाशीकडे निघाली होती. गंगोत्री दर्शनानंतर परतीच्या मार्गावर असताना त्यांच्याशी संपर्क तुटला होता. उत्तरकाशी परिसरात काल ढगफुटी झाली होती आणि त्यानंतरच या भाविकांशी संपर्क होऊ शकलेला नाही.'शुभ यात्री' ट्रॅव्हल्स कंपनीमार्फत हे कुटुंबीय यात्रेसाठी गेलेले होते. दरम्यान, या यात्रेकरूशी अजूनही संपर्क न झाल्याने त्यांचे नातेवाईक मात्र चिंतेत आहे. भारत सरकार व आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेने आमच्या नातेवाईकांशी संपर्क करून द्यावा, अशी भावनिक साद ते सध्या घालत आहे.

## निवडणूक आयोगाने भाजपसोबत निवडणूक चोरली; महाराष्ट्रात ४० लाख संशयास्पद नावे, कर्नाटकातही घोटाळा; राहुल गांधींचा गंभीर आरोप

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी गुरूवारी मतदार यादी पडताळणीतील अनियमिततेबाबत सादरीकरण करत निवडणूक आयोग आणि भाजपवर मतचोरीचा गंभीर आरोप केला.

स्क्रीनवर कर्नाटकची मतदार यादी दाखवताना राहुल म्हणाले की, महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन्ही राज्यांच्या मतदार यादीत संशयास्पद मतदार आहेत. ते म्हणाले की, महाराष्ट्राचे निकाल पाहिल्यानंतर आमच्या शंकांना पुष्टी मिळाली की निवडणूक चोरी झाली आहे. मशीन रीडेबल मतदार यादी न दिल्याने, निवडणूक आयोगाने भाजपशी संगनमत करून महाराष्ट्राची निवडणूक चोरली आहे अशी आमची खात्री पटली असल्याचे ते म्हणाले. राहुल म्हणाले की, कर्नाटकात वेगवेगळ्या बूथच्या मतदार यादीत एकाच व्यक्तीचे नाव आहे. अनेक ठिकाणी यादीत लोकांचे फोटो नाहीत. त्याच वेळी, अनेक ठिकाणी बनावट पत्ते लिहिले गेले आहेत.

स्क्रीनवर कर्नाटकच्या महादेवपुरा विधानसभा मतदारसंघाची मतदार यादी दाखवताना राहुल म्हणाले की, येथील ६.५ लाख मतांपैकी १ लाख मते चोरीला गेली आहेत. काँग्रेसच्या संशोधनातून सुमारे एक लाख चुकीचे पत्ते आणि एकाच पत्त्यावर मोठ्या प्रमाणात मतदार आणि डुप्लिकेट मतदार असल्याचे उघड झाले. कर्नाटकात आपण १६ जागा जिंकल्या असत्या, पण आपण फक्त ९ जागा जिंकल्या. या सात गमावलेल्या जागांपैकी एकाची आम्ही चौकशी केली, ती जागा बेंगळुरू सेंट्रल होती. या जागेवर काँग्रेसला ६,२६,२०८ मते मिळाली. भाजपला ६,५८,९१५ मते मिळाली. दोन्ही पक्षांना मिळालेल्या मतांमध्ये फक्त ३२,७०७ फरक होता. महादेवपुरा विधानसभा जागेवर मतदान झाले तेव्हा दोन्ही पक्षांमधील मतांमध्ये १,१४,०४६ फरक होता, असे राहुल गांधी म्हणाले.

### राहुल गांधी यांच्या डोक्यातील चीप चोरीला –फडणवीस

महाराष्ट्रात ७५ लाख मतदार वाढले, असा दावा त्यांनी केला होता. त्यानंतर आता ते राज्यात एक कोटी मतदार वाढले आहेत, असा दावा करीत आहेत. प्रत्येक वेळी काहीतरी नवे सांगून ते लक्ष वेधण्याचा प्रयत्न करीत आहेत. जनाधार आता संपला असल्याचे त्यांच्या लक्षात आले असून बिहारमध्येही ते निवडून येणार नाहीत. महाराष्ट्रातील पुढील निवडणुकाही त्यांना यश मिळणार नाही, याची जाणीव असल्याने ते आधीच अशी वातावरण निर्मिती करीत आहेत. मतांची चोरी राज्यात किंवा देशात कोठेही झालेली नाही. मात्र लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधींच्या डोक्यातील चीप चोरीला गेली असून हार्डडिस्क करप्ट झाली आहे, अशी टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

## 'हर घर तिरंगा, हर घर स्वच्छता' नांदेड जिल्ह्यात ८ ते १५ ऑगस्टदरम्यान विशेष मोहीम –मुख्य कार्यकारी अधिकारी कावली

**नांदेड (प्रतिनिधी)–** देशभरात दि. ८ ते १५ ऑगस्ट या कालावधीत केंद्र शासनाच्या निर्देशानुसार हर घर तिरंगा हर घर स्वच्छता ही विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. नांदेड जिल्ह्यातही या मोहिमेचे आयोजन करण्यात आले असून, विविध उपक्रमांच्या माध्यमातून स्वातंत्र्याचा उत्सव स्वच्छतेच्या संकल्पाने साजरा करण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांनी दिली आहे.



या मोहीमेचा दि. ८ ऑगस्ट रोजी शुभारंभ होणार असून, यावेळी गावागावात स्वच्छ सुजल गाव ही प्रतिज्ञा घेतली जाणार आहे. दिनांक ८ ते १५ ऑगस्ट दरम्यान विविध उपक्रम राबवले जाणार आहेत. प्लास्टिकमुक्ती, नाल्यांची स्वच्छता, पाणी गळती थांबवणे, सार्वजनिक शौचालयांची स्वच्छता, जलकुंभ स्वच्छता, पायाभूत सुविधा आणि वॉश घटकांचे सुशोभीकरण, जलसंवर्धन, भूजल पुनर्भरण, शौचालय स्वच्छता, आणि गावातील रस्ते व ठिकाणांची सजावट केली जाणार आहे.

या मोहिमेत नागरिकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले, ग्राम पंचायत विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी डी. बी. गिरी व जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक अमित राठोड यांनी यांनी केले आहे.

## २६ ऑगस्ट रोजी स्व. आ. बळवंतराव चव्हाण व स्व. खा. वसंतराव चव्हाण यांच्या पुर्णाकृती पुतळ्यांचे अनावरण

### नायगाव येथील पुष्पांजली कार्यक्रमात खा.रवींद्र चव्हाण यांची माहिती



**नांदेड (प्रतिनिधी)–** नायगाव येथे येत्या २६ ऑगस्ट रोजी स्व. आ. बळवंतराव चव्हाण व स्व.खा. वसंतराव चव्हाण यांचा पुतळा अनावरण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यास मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे, अशी माहिती खासदार रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी नायगावचे ज्येष्ठ नेते व माजी आमदार स्व. बळवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिप्रित्यर्थ आयोजित पुष्पांजली कार्यक्रमात दिली.

स्व.आ.बळवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिप्रित्यर्थ नायगाव येथे गुरुवार, दि. ७ ऑगस्ट रोजी सकाळी हनुमान मंदिर परिसरात खा.रवींद्र वसंतराव चव्हाण व चव्हाण परिवाराच्यावतीने पुष्पांजली अर्पण करण्यात आली. यावेळी चव्हाण परिवारातील सदस्यांसह माधव आप्पा बेळगे, शिवराज पाटील होटाळकर, संजय पाटील शेळगावकर, गोविंदराव पाटील शिंदीकर, प्रल्हाद पाटील इजतगावकर, बालाजी पाटील हातनीकर, शिवाजी पाटील बेटमोगरेकर, हणमंतराव पाटील, डॉ. मधुकर राठोड, बालाजीराव मदेवाड, प्राचार्य मनोहर पवार, अजित अटकळीकर, संजय आप्पा बेळगे, मनोज पाटील सावंत, दिगंबर पाटील सावंत, मोहन पाटील कार्लेकर, राजू पाटील बोळशेखर यांच्यासह नायगाव शहरातील प्रतिष्ठित नागरिक, व्यापारी व विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती.

## सीआरपीएफचे वाहन खोल दरीत कोसळले, दोन जवानांचा मृत्यू

**श्रीनगर (प्रतिनिधी)–** जम्मू-काश्मीरमधील उधमपूर जिल्ह्यात बसंतगड परिसरात एक मोठा अपघात घडला आहे. केंद्रीय राखीव पोलीस दल (सीआरपीएफ) चे जवान घेऊन जाणारा ट्रक खोल दरीत कोसळल्याने २ जवानांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, १२ जवान गंभीर जखमी झाले आहेत. अपघात घडताच तातडीने मदतकार्य सुरू करण्यात आलं आणि सर्व जखमी जवानांना उपचारासाठी कमांड हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आलं आहे. अपघाताचं नेमकं कारण अद्याप स्पष्ट झालेलं नाही. स्थानिक प्रशासन व सुरक्षा यंत्रणांकडून घटनास्थळी तपास सुरू आहे. या दुर्घटनेमुळे संपूर्ण सुरक्षा दलामध्ये शोककळा पसरली आहे. या वाहनाने १८ जवानांना घेऊन कडवा येथून बसंतगडकडे कूच केली होती.

## हेरॉईनसह अंमली पदार्थ जप्त, दोघांना पोलीस कोठडी; विमानतळ पोलिसांची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराच्या विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत नमस्कार चौक परिसरात हेरॉईनसह अन्य नशेली पदार्थ विनापरवाना विक्री करणाऱ्या दोघांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून विमानतळ ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापूर्वी या शहरात गांजा, पापिस्ट्रा पावडर असे अंमली पदार्थ विकल्या जात होते. आता तर चक्क हेरोईन व घातक अंमली पदार्थ विक्री होत असल्याने नांदेड शहर हे अंमली पदार्थांचे माहेरघर होत आहे की काय? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.



पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार आणि अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांनी शहर व जिल्ह्यात अंमली पदार्थ विक्री करणाऱ्यांच्या मुसक्या आवळण्याच्या सूचना प्रभारी अधिकारी यांना आदेशित केले होते. त्या अनुषंगाने विमानतळ ठाण्याचे नूतन पोलीस निरीक्षक चितांबर कामठेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या गुन्हे शोध पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी ठाण्याच्या हद्दीत गस्त घालण्यास सुरुवात केली. दि. ६ ऑगस्ट रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे इंडियन पेट्रोल पंप, नमस्कार चौक येथे जावून कारवाई केली. यावेळी गुरुबिरसिंघ हरपालसिंघ (वय ५५ वर्ष, रा. नमस्कार चौक), जगजितसिंघ अवतारसिंघ गिल (वय ४० वर्षे, रा. गुरुव्दारा गेट क्रमांक २) नांदेड हे विनापरवाना बेकायदेशीररित्या एन.डी.पी.एस ॲक्टच्या तरतुदीचे भंग करुन अंमली पदार्थ हेरॉईन ०७.३१ ग्रॅम एक पॅकेट व Pregalab-३०० चे सहा पॅकेट असा एकूण किंमत ६ हजार ७०१ रुपयाचा मुद्देमाल लोकांना विक्री करण्यासाठी ताब्यात बाळगलेले मिळून आले. मिळालेला मुद्देमाल जप्त करुन गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपी यांना अटक करुन न्यायालयात हजर केले असता न्यायालयानी आरोपींना एका दिवसाची पोलीस कोठडी देण्यात आली आहे. वरील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केलेल्या कामगिरीचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी कौतुक केले आहे.




## मिशन समाधानमधून कम्युनिटी पोलिसींग आणि सिटी स्ट्रीट सेफ्टी पथकामुळे गुन्हेगारांत धडकी

**नांदेड (प्रल्हाद कांबळे)–** पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी वर्षभरात गुन्हेगारीवर आळा घालण्यासाठी विधिध उपक्रम राबविले आहेत. कम्युनिटी पोलिसिंग मधून मिशन सहयोगअंतर्गत जिल्ह्यातील जवळपास साडेसात हजार बेरोजगारांचा मेळावा घेऊन साडेतीन हजार हातांना काम दिले. ऑपरेशन 'फ्लश आउट' अंतर्गत जिल्ह्यातील सराईत गुन्हेगारांना आऊट केले. विशेष म्हणजे पोलीस कुटुंबासाठीही ओमकार ध्यान धारणा केंद्र स्थापन करून इन्स्टा वापरणाऱ्यांवर सुद्धा त्यांनी करडी नजर ठेवली. आज पोलीस अधीक्षक पदाचा पदभार घेऊन त्यांना एक वर्ष पूर्ण झाले.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक पदाचा ८ ऑगस्ट २०२४ रोजी तत्कालीन पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्याकडून पदभार घेतला होता. अतिरिक्त पोलीस अधीक्षक म्हणून काम केल्यानंतर अबिनाश कुमार यांना जिल्ह्याचा चांगला अभ्यास झाला. एसपी पदाचा पदभार घेताच त्यांनी सर्वप्रथम गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्यास सुरुवात केली. गोळीबार प्रकरणातील तसेच पिस्तुलधारी युवकांना अटक करून झोपडपट्टी दादा कायद्यांतर्गत स्थानबद्ध केले. भारतीय हत्यार कायद्याअंतर्गत जवळपास अडीचशेहून अधिक कारवाया करून गुन्हेगारांना सळो की पळो करून सोडले. मुख्यमंत्र्यांच्या शंभर दिवस कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यातील कामकाज सुधारले. त्यासोबतच नांदेडकरांच्या सुरक्षेसाठी सिटी स्ट्रीट सेफ्टी पथक स्थापन केले. अवैध वाळू माफियांचे आर्थिक कंबरडे मोडण्यासाठी स्वतः दुचाकीवरून जाऊन त्यांनी कारवाया केल्या.



महिला मुलींची छेड काढणाऱ्यांना त्यांची जागा दाखवली. जिल्हाभरात अंमली पदार्थ विरोधी मोहीम राबवून आरोपींना अटक केली. गुन्हेगारांना त्यांची जागा दाखवत असतानाच आपल्या पोलीस कुटुंबासाठी संस्कार व योग शिबिर घेऊन ओमकार ध्यान धारणा केंद्र व श्री गुरुगोविंद सिंघ उद्यानाचे उद्घाटन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, रामनवमी, रमजान ईद, होळी, गणेश उत्सव हे महत्त्वाचे सण निर्विघ्न पार पाडले. विशेष म्हणजे भीम जयंतीनिमित्त १८ तास अभ्यास अभियान उपक्रम राबवून डॉ. आंबेडकरांना पोलीस दलाच्यावतीने अभिवादन करण्यात आले.

जिल्हाभरात विद्यार्थ्यांसाठी सायबर जनजागृती करून क्यूआरकोडचे वाटप करण्यात आले. निर्भया वारी मिशन समाधान अंतर्गत शहरात आषाढी एकादशीनिमित्त काढण्यात आली. गोवंश, गुटखा माफियाविरुद्ध कारवाया करून त्यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल केले. इन्स्टाग्राम वापरणाऱ्या युवकांवर शांतता भंग करणारे पोस्ट व्हायरल केल्यानंतर त्यांनाही पोलिसांच्या खाकीचा धाक दाखवला. खून, जबरी चोरी, घरफोडी, अत्याचार आदी महत्त्वाच्या गुन्ह्यात गुन्हेगारांना अटक करून जेरबंद केले. यासाठी माझ्या अधिकाऱ्यांसह सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. येणाऱ्या काळातही जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था बाधित होणार नाही, यासाठी जिल्हा पोलीस दल सक्षम असल्याचे अबिनाश कुमार यांनी 'गोदातीर समाचार'शी बोलताना सांगितले.

## ओला-उबरच्या धर्तीवर आता एसटी बससाठी ॲप येणार

**मुंबई (प्रतिनिधी)–** ओला, उबर आणि रॅपिडो यांसारख्या खाजगी वाहतूक सेवांप्रमाणे आता महाराष्ट्र सरकार स्वतःचं ॲप विकसित करणार आहे. विशेष म्हणजे हे ॲप राज्य मार्ग परिवहन महामंडळ म्हणजेच एसटीमार्फत चालवलं जाणार असून परिवहन खात्याच्या अलीकडील बैठकीत या संदर्भात महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. हे ॲप पूर्णपणे एसटी महामंडळाद्वारे चालवण्यात येणार असून, प्रवाशांना घरबसल्या बुकिंग, बस लोकेशन ट्रॅकिंग, वेळापत्रक माहिती, आणि कस्टमर सपोर्टसारख्या सुविधा एका क्लिकवर मिळण्याची शक्यता आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# जैवविविधतेचे रक्षण काळाची गरज

आपण सध्या एका अशा काळात आहोत, जेव्हा पृथ्वीवरील जैवविविधता गंभीर संकटात आहे. शास्त्रीय आकडेवारी आणि जागतिक अहवाल सातत्याने इशारा देत आहेत की, जैविक प्रजाती अत्यंत वेगाने नष्ट होऊ लागल्या आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या एका अलीकडील अहवालानुसार, जैविक प्रजाती नष्ट होण्याचा सध्याचा वेग हा नैसर्गिक गतीपेक्षा नऊ ते दहा पट अधिक आहे. वेगवाढीने नष्ट होणारी प्रजाती केवळ निसर्गासाठीच नव्हे, तर मानवासाठीही अनंत अडचणींचे कारण ठरत आहे. जैवविविधतेचा ऱ्हास म्हणजे मानवतेच्या पायाखालची जमीन खचणे, पण हे कोणी लक्षात घ्यायला तयार नाही. जैवविविधतेचा विनाश म्हणजे नुसतीच झाडे वा प्राणी नष्ट होणे नाही. हा एक साखळीबद्ध परिणाम असतो. मातीची गुणवत्ता ढासळते, परागकण गोळा करणाऱ्या मधमाश्या कमी होतात, जलस्त्रोत प्रदूषित होतात आणि परिणामी अन्नसुरक्षेवर टाच येते. म्हणजेच, जैवविविधतेचे रक्षण हे केवळ पर्यावरणप्रेमाची बाब राहिलेली नाही, तर ती अन्न, आरोग्य आणि भविष्यातील जीवनमानाशी थेट संबंधित झाली आहे. पर्यावरणाच्या रक्षणाची आश्वासने आणि वास्तवातील तफावत ही दूर करण्याची वेळ आली आहे. दुर्दैवाने ही गंभीर परिस्थिती असूनही जागतिक स्तरावर याकडे जेवढे लक्ष दिले पाहिजे, तेवढे दिले जात नाही. विविध देशांच्या नेत्यांकडून पर्यावरणरक्षणाच्या घोषणा केल्या जातात, आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये ध्येये आखली जातात, जाहीरनामे प्रसिद्ध होतात; मात्र त्यांच्या अंमलबजावणीची स्थिती अत्यंत निराशाजनक आहे. कारण यामध्ये त्यांचा स्वार्थ दडलेला असतो. विशेषतः चीनसारख्या मुजोर आणि दुष्ट प्रवृत्तीच्या राष्ट्राकडून याचे उल्लंघन होत असते. जैवविविधतेच्या रक्षणाच्या नावाखाली अनेकदा भांडवलशाही हितसंबंध अधिक महत्त्वाचे ठरतात. या मुद्द्यावरही 'विकसनशील देश' आणि 'विकसित देश' यामधील दुभंग स्पष्टपणे जाणवतो. याद्वारा निसर्गाच्या छाताडावर उत्खननाचा घाव घालण्यास कुणीही मागे-पुढे पाहात नाही. आज आफ्रिका, आशिया व लॅटिन अमेरिका यांसारख्या जैवविविधतेने संपन्न भागांमध्ये बहुराष्ट्रीय कंपन्या खाण उत्खनन, झाडांची बेसुमार तोड आणि जैविक पेटंटींग यांसारख्या माध्यमांतून निसर्गाची लूट करत आहेत. पर्यावरणाची किंमत मोजावी लागते ती स्थानिक, गरीब समदायांना. त्यांच्या जमिनी, त्यांच्या जीवनशैली नष्ट केल्या जातात. हे केवळ पर्यावरणीय अन्याय नाही, तर सामाजिक अन्यायाचेही भयावह रूप आहे. भारतातील परिस्थिती यापेक्षा वेगळी नाही. आपल्याकडे समृद्धतेपासून विनाशाकडे वाटचाल सुरू आहे. भारत जैवविविधतेच्या दृष्टीने अतिशय समृद्ध देश आहे. विविध हवामान, परिसंस्था, पारंपरिक ज्ञान आणि संस्कृती यामुळे भारतात हजारो प्रजातींचे अस्तित्व नोंदले गेले आहे. परंतु अलीकडच्या काळात आर्थिक विकासाच्या नावावर जंगलतोड, प्रकल्पांसाठी जमिनींचा ताबा आणि औद्योगिकीकरणाचा अतिरेक हे जैवविविधतेसाठी घातक ठरत आहेत. अनेक दुर्मीळ प्रजाती नामशेष होत आहेत आणि आदिवासी समाजाला त्यांच्या निसर्गाशी जोडलेल्या जमिनींवरून जबरदस्तीने हटवले जात आहे. अर्थातच आपल्या देशात लोकशाही, निसर्ग आणि आपत्ती याकडे कमालीचे दुर्लक्ष केले जाते आहे. हे चित्र धक्कादायक आणि आपल्याला प्रश्न विचारायला लावणारे आहे. आपण निसर्गाच्या आणि जैवविविधतेच्या संरक्षणाबाबत खरेच गंभीर आहोत का? की ही फक्त औपचारिक चर्चा आणि कागदी कारवाईची बाब राहिली आहे? भविष्यातील कोणतीही पर्यावरणीय आपत्ती ही अचानक येणारी नसते, ती आपल्या आजच्या निष्काळजी धोरणांची परिणामकारक झलक असते. ही निष्काळजीपणाची किंमत आपल्याला अन्नाच्या टंचाई, रोगप्रसार, पाण्याचा अभाव आणि आर्थिक अस्थिरतेच्या रूपात मोजावी लागेल. यावर उपाय काय? याचाही विचार होणे गरजेचे आहे. यातून मार्ग काढायचा असेल, तर जैवविविधतेच्या रक्षणासाठी केवळ घोषणांपेक्षा अधिक ठोस कृती करावी लागेल. धोरणांमध्ये स्थानिक समुदायांचा सहभाग असावा, आदिवासींच्या पारंपरिक ज्ञानाची कदर करावी लागेल आणि नैसर्गिक संसाधनांच्या वापरावर जबाबदारीने मर्यादा घालाव्या लागतील. शिक्षण, संशोधन आणि लोकप्रबोधनातून जैवविविधतेच्या महत्त्वाविषयी लोकांना जागरूक करणे ही काळाची गरज आहे. म्हणूनच आता जगाला जैवविविधतेच्या संकटाकडे नव्याने पाहण्याची गरज निर्माण झाली आहे. हा प्रश्न पर्यावरणाचा असला, तरी त्याचे परिणाम राजकीय, सामाजिक आणि आर्थिक पातळीवर भयानक स्वरूप घेणार आहेत. आज निसर्ग उद्ध्वस्त होत असला, तरी त्याचे खरे बळी आपल्यातीलच माणसे ठरणार आहेत. म्हणूनच, जैवविविधतेचे रक्षण हे केवळ पर्यावरणप्रेम नव्हे, तर मानवी स्वार्थाचा दूरदृष्टीने विचार करण्याची प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया थांबली, तर आपले भवितव्यही अंधारात जाणार, हे निश्चित.

# विनोद सम्राट शाहीर दादा कोंडके



आज ८ ऑगस्ट, आपल्या इरसाल आणि गावरान भाषेतील विनोदाने महाराष्ट्राला खळखळून हसवणारे विनोद सम्राट शाहीर दादा कोंडके यांची जयंती. जवळपास तीन दशकांहून अधिक काळ मराठी चित्रपट सृष्टीवर एकहाती अधिराज्य गाजवून मराठी सिनेमाला सुवर्णकाळ दाखवणाऱ्या विनोद सम्राट दादा कोंडके यांचा जन्म ८ ऑगस्ट १९३२ रोजी मुंबईतील नायगाव येथे झाला. त्यांचा जन्म झाला तो दिवस गोकुळ अष्टमीच्या होता, आपल्या पोटी बाळकृष्ण जन्माला आला म्हणून आई वडिलांनी त्यांचे नाव कृष्णा ठेवले. पण लहानपणापासूनच सर्व जन त्यांना दादा म्हणत पुढे त्यांचे नाव रूढ झाले. त्यांच्या मोठ्या बंधूचे निधन झाल्याने त्यांच्यावर घराची जबाबदारी पडली त्यामुळे दादा दरमहा साठ रुपये पगारावर सेवादलाच्या बँड पथकात काम करू लागले.

लहानपणापासून दादांना कलेची आवड होती. सेवादलाच्या बँड पथकात त्यांच्या कला आणखी बहरून आल्या. फावल्या वेळात प्रसिद्ध गाण्यांचे विडंबन करणे, गाण्यांना चाली लावणे, विचित्र गाणी रचणे असे उद्योग दादा करू लागले. निळू फुले, राम नगरकर यासारखे जेष्ठ कलाकारही त्या काळात सेवादलात होते. तिथेच दादांची या महान कलाकारांशी मैत्री झाली आणि ही मैत्री पुढे आयुष्यभर टिकून राहिली. दादा सेवादलाच्या बँड पथकात काम करत असल्याने त्या काळात त्यांना बँड वाले दादा म्हणूनच लोक ओळखत असे. पुढे दादांनी स्वतःचा फड काढला. गावोगावी जाऊन दादा स्वतःची कला सादर करू लागले.

वसंत सबनिसांच्या विच्छा माझी पुरी करा या वगनाट्याने त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळाली. विच्छा माझी पुरी करा या वगनाट्याने दीडशे प्रयोग पूर्ण केले. त्या काळी हा विक्रम होता. या वगनाट्यामुळे दादा भलतेच लोकप्रिय झाले. गावागावांतील रसिक प्रेक्षक दादांना ओळखू लागले. याच वगनाट्यातील त्यांचे काम पाहून महान दिग्दर्शक भालजी पेंढारकर यांनी त्यांना थेट चित्रपटात काम करण्याची संधी दिली. भालजी पेंढारकर यांनी त्यांना त्यांच्या तांबडी माती या चित्रपटात मुख्य भूमिका दिली.

दादांनी या भूमिकेचे सोने केले. हा चित्रपट तिकीटबारीवर हिट झाला. या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय झाली. या चित्रपटानंतर दादांनी मागे वळून पाहिले नाही. मराठी चित्रपट सृष्टीत दादा कोंडके हे सर्वत्र नाव घुमू लागले. १९७१ साली दादा कोंडके यांनी दिग्दर्शित केलेला सोंगाड्या हा चित्रपट प्रदर्शित झाला मात्र मुंबईतील चित्रपटगृह चालकांनी आपल्या चित्रपटगृहात सोंगाड्या न लावता तीन देविया हा हिंदी चित्रपट लावला. आपल्या पहिल्याच चित्रपटाला चित्रपटगृह मिळत नसल्याचे पाहून दादा उद्विग्न झाले आणि त्यांनी थेट बाळासाहेब ठाकरेंची भेट घेतली मग काय बाळासाहेबांचा आदेश आणि शिवसैनिकांचा चित्रपटगृहात राडा. शिवसैनिकांनी चित्रपटगृहात घातलेल्या राड्याने आणि बाळासाहेबांच्या आदेशाने सोंगाड्या चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. नुसताच प्रदर्शित झाला नाही तर सुपर डूपर हिट झाला. सोंगाड्या पाहायला प्रेक्षकांच्या रांगा लागल्या.

सोंगाड्या हा त्या काळातील सर्वाधिक हिट मराठी चित्रपट ठरला. सोंगाड्यामुळे मरगळलेल्या मराठी चित्रपट सृष्टीला ऊर्जितावस्था मिळाली. तमाशापटाला कंटाळलेल्या मराठी चित्रपट रसिकांना सोंगाड्यात दादांनी आपल्या विनोदाने मनमुराद हसवले. दादांच्या विनोदाला मराठी रसिकांनी मनमुराद दाद दिली. सोंगाड्याच्या अभूतपूर्व यशानंतर दादा कोंडके यांनी आणखी एका नव्या चित्रपटाची घोषणा केली या चित्रपटाचे नाव होते एकटा जीव सदाशिव. सोंगाड्यामुळे दादांची लोकप्रियता तुफान वाढली होती. या लोकप्रियतेचा धसका हिंदी चित्रपट सृष्टीनेही घेतला होता. दादांनी एकटा जीव सदाशिव या चित्रपटाची घोषणा केल्यावर राज कपूर यांनी त्यांच्या मुलासाठी म्हणजे ऋषी कपूर साठी काढलेला बॉबी या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलली.

सोंगाड्या पाठोपाठ एकटा जीव सदाशिव हा चित्रपटही सुपर हिट झाला. त्यानंतर दादांनी पांडू हवालदार या चित्रपटाची निर्मिती केली. या चित्रपटात दादांनी अशोक सराफ यांना संधी दिली. हा चित्रपटही यशस्वी ठरला मग काय त्यानंतर दादांच्या यशस्वी चित्रपटांची मालिकाच सुरू झाली. तुमचं आमचं जमल, राम राम गंगाराम, बोट लावील तिथं गुदगुल्या, ह्योच नवरा पाहिजे, आली अंगावर, मुका घ्या मुका, पळवा पळवी, येऊ का घरात, सासरचे धोतर असे दादांचे सलग चित्रपट यशस्वी झाले.

सलग नऊ रौप्य महोत्सवी चित्रपट देण्याचा विक्रम दादांनी केला. त्यांच्या या विक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये झाली. त्यांच्या यशस्वी चित्रपटात त्यांच्या इरसाल विनोदाचा जितका वाटा होता तितकाच त्या चित्रपटातील श्रवणीय गाण्यांचा देखील होता. दादा कोंडके यांच्या चित्रपटातील सर्व गाणी गाजली. आजही दादांच्या चित्रपटातील गाणी तितकीच लोकप्रिय आहेत. दादांचे चित्रपट जितके लोकप्रिय झाले तितकेच ते वादग्रस्तही ठरले. त्यांच्या सर्वच चित्रपटांना सेन्सॉर बोर्डने आडकाठी आणली मात्र दादांनी सेन्सॉर बोर्डाच्या या दंडेली पुढे कधीही नमते घेतले नाही उलट सेन्सॉर बोर्डशी त्यांनी कायम दोन हात केले. ज्या शिवसेनेमुळे त्यांचे चित्रपट चित्रपटगृहात प्रदर्शित होऊ शकले त्या शिवसेनेशी त्यांनी कधीही प्रतारणा केली नाही. आयुष्यभर त्यांनी शिवसेनेशी बांधिलकी राखली. १४ मार्च १९९८ रोजी हृदय विकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. दादांच्या निधनाने मराठी मनोरंजन विश्वावर दुःखाचा डोंगर कोसळला. प्रेक्षकांना खळखळून हसवणाऱ्या विनोदाच्या या सम्राटाने अशी अकाली एक्झीट घेतल्याने प्रेक्षकांना मोठा धक्का बसला. त्यांच्या निधनाने मराठी मनोरंजन विश्वाला सुवर्णकाळ दाखवणारा विनोदाचा सम्राट काळाच्या पडद्याआड गेला. मराठी चित्रपट सृष्टीत त्यांच्यासारखा विनोद सम्राट पूर्वी झाला नाही आणि पुढेही होणार नाही. विनोद सम्राट दादा कोंडके यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**–श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# यशाची फळे चाखायची असतील, तर संघर्ष करावाच लागतो!



असे म्हणतात की, अपयशाचे कडू डोस पिल्याशिवाय किंवा पिऊन ते पचवल्याशिवाय यश नावाची आपल्याला सहज हवी हवीशी गोष्ट प्राप्त होत नाही.. प्रत्येकाला यश पाहिजे असते पण त्यासाठी करावा लागणारा संघर्ष किंवा प्रयत्न करण्याची कुणाचीच तयारी असत नाही..अर्थात यालाही काही बोटावर मोजण्याइतके अपवाद असतील, पण जेव्हा आपण आपला इतिहास पाहतो, तेव्हा आपल्या लक्षात येते, की ज्याने कुणी यश प्राप्त केले आहे, त्याला संघर्षाच्या काटेरी मार्गावरून जाऊनच, यश नावाच्या गुलाबाचा सुगंध घेता आला. अर्थातच संघर्ष कुणालाच टाळता आलेला नाही.

स्वातंत्र्य पूर्वीचा भारत व स्वातंत्र्यलढ्यात आपल्या प्राणाची आहुती देणारे सर्व भारत मातेचे पुत्र, वीर बलिदानी, यांनी इंग्रजांना भारताच्या बाहेर हाकलून लावण्यासाठी, पराकोटीचा विविध प्रकारचा संघर्ष केला, त्यांनी इंग्रजा विरोधात दीडशे वर्ष संघर्ष करून, लढा देऊन, आपल्याला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करून हे स्वातंत्र्य नावाचे फळ चाखायला दिले.. अर्थातच यशाची फळे चाखायचे असतील, तर माणूस नावाच्या झाडाला ऊन, वारा आणि पाऊस यांच्याशी संघर्ष करावाच लागतो...

छत्रपती शिवरायांना सुद्धा हिंदवी स्वराज्य निर्माण करण्यासाठी मुघलांसोबत लढा द्यावा लागला, कठोर संघर्ष करावा लागला.. त्यांनी अखंड संघर्षाच्या, प्रयत्नाच्या, संयमाच्या आणि जिद्दीच्या जोरावर, शून्यातून हिंदवी स्वराज्य निर्माण केले व आपल्यापुढे संघर्षाचे अप्रतिम उदाहरण ठेवले आहे..

त्यांचा हा पराकोटीचा संघर्ष, आपल्याला कितीही प्रतिकूल परिस्थिती असेल, तरी नव्या जोमाने लढायला प्रेरणा देतो..सोबतच संतांचा काळ तर संघर्षाचा काळ म्हणून ओळखला जातो. आपल्या इतिहासात आपल्याला विविध प्रकारच्या गोष्टींसाठी विविध संघर्ष झालेले दिसून येतात, त्यात कुणी जातीपाती विरोधात संघर्ष केला, तर कुणी वर्ण द्वेष विरोधात, कुणी विषमते विरोधात, तर कुणी अन्यायग्रस्त समाजाला, योग्य न्याय मिळवून देण्यासाठी. संघर्षाचे प्रमाण भलेही कमी अधिक असेल, त्याचे स्वरूपही वेगळे असेल पण संघर्ष कुणालाही टळला नाही..

कुणाच्याही अस्तित्वाची नोंद सहजासहजी कुठल्याच काळात, कुणीच घेतलेली दिसून येत नाही..पण ज्यांनी प्रतिकूल परिस्थितीशी दोन हात करून, आपल्या अस्तित्वाची झलक दाखवली किंवा आपले पाय जमिनीवर घट्ट रोऊन, परिस्थितीशी निकराने लढा देऊन, काळाच्या पडद्यावर आपले अखंड अस्तित्व निर्माण केले, जगाने त्यांच्या अस्तित्वाची नोंद घेतली आहे.. माणसाला आपली प्रतिमा उजळ करायची असेल, तर त्याला प्राप्त परिस्थितीशी लढण्याएवढा, दुसरा कुठलाच रामबाण उपाय नसून, तोच एकमेव मार्ग माणसाला आपल्या स्वतःचे अस्तित्व निर्माण करण्यासाठी

उपयोगाचा ठरतो.. प्रतिमा त्यांचीच निर्माण होते,ज्यांनी संघर्षाच्या काटेरी मार्गावरून प्रवसा केलेला असतो..

अनेक लढव्या लोकांचा इतिहास, आपल्याला आजही तेवढ्याच जिद्दीने लढण्याची प्रेरणा देत असतो.. किंबहुना पुढच्या पिढीला, लढव्या लोकांचे अनुभव लढायला बळ देत असतात...

देरे हरी पलंगावरी या उक्तीनुसार, जाग्यावर बसून कुणालाही काही मिळालेले नाही व मिळत सुद्धा नाही. जमिनीमध्ये जेव्हा आपण बीज पेरतो, तेव्हा त्यातून उगवून येणाऱ्या रोपट्याला सुद्धा ऊन, वारा आणि पाऊस यांच्यासोबत संघर्ष करूनच आपले अस्तित्व निमर्ण करावे लागते.. अर्थातच संघर्षाचा शिवधनुष्य ज्याने ज्याने लीलया पेलला आहे, त्याला त्याला यशाचा मार्ग गवसला आहे. खरे पाहता यशाचा मार्ग हा 'काटेरी मार्ग असतो व वाटेतील काट्यांशी संघर्ष करूनच, कुणालाही आपल्या अस्तित्वाचा किनारा गाठता येतो..

असे म्हणतात की,
अगर इरादे बुलंद हो,
तो रास्ते मिलते है,
अगर इरादे कच्चे
हो, तो बहाने निकलते है

वरील ओळींना समर्पक दाखला म्हणून, कुठल्यातरी राजाने त्याच्या लढाईत पराभूत होण्याचे कारण असे सांगितले होते, की त्याच्या एका हातात तलवार आणि दुसऱ्या हातात ढाल असल्यामुळे, तो त्याच्या समोरील शत्रूसोबत लढू शकला नाही व त्याचा पराभव झाला.. आपणाला असे निरर्थक कारण देऊन चालणार नाही...जगण्याच्या लढाईत आपणाला केवळ कारणांच्या कुबड्यांचा आधार घेऊन ही लढाई आपण जिंकू शकणार नाही, तर संघर्षाच्या हातात हात देऊन, आपल्याला बिकट परिस्थितीशी दोन हात करता यायला हवे, तरच आपल्याला आपले ठरवलेले निश्चित यश नक्कीच मिळेल... आजचा काळ आणि त्याची जटीलता पाहता मनात यश प्राप्तीच्या केवळ इच्छांचे बीज पेरून, यशाचे पीक उगवणार नाही, तर अतिशय प्रतिकूल परिस्थितीवर, तितक्याच ताकदीने प्रयत्न रुपी संघर्षाचा मारा करून, किंबहुना यश प्राप्तीच्या अवघड किनाऱ्याला, प्रयत्नांच्या खडकावर धडका मारूनच आपली यश मिळवण्याची शक्यता गडद होऊ शकते...बाकी संघर्ष कुणालाच टळला नव्हता, टळत नाही व टळणार सुद्धा नाही हे मात्र नक्की...

चला संघर्षाच्या गावाला जाऊ,
संघर्षाने आपले अस्तित्व
निर्माण करु, चला आपल्या
स्वप्नांना मूर्त रूप देऊ..
चला संघर्ष करून तर पाहू...

**–प्रा. अमित शिंदे,**
मु. पो. रोहीपिंपळगाव
ता. मुदखेड, जि. नांदेड
मो. ९७६७८५१०४६

# व्यक्ती तितक्या प्रवृत्ती

दिवसामागून दिवस निघून जातात. महिने-महिने करत वर्षे ही जाते. अनेक वर्ष होतात. माणसाच्या आयुष्यात, वेगवेगळ्या वळणावर, वेगवेगळी माणसे येतात आणि जातात. याच अनेक माणसांमध्ये काही माणसं हृदयाच्या तळापर्यंत पोहोचतात. काहीचा सहवास हवाहवासा वाटायला लागतो. काही मात्र क्षणभराच्या सहवासासाठीही नको वाटतात. अनेक माणसे, अनेक स्वभाव. 'मूर्ती तितक्या प्रवृत्ती.' प्रत्येकाच्या वेगवेगळ्या पद्धती, प्रत्येकाचे वेगवेगळे विचार. माणसं आणि त्यांचा स्वभाव आवडण्यासाठी किती क्षणाचा सहवास अपेक्षित असतो...? हे निश्चित सांगता येत नाही. कुणाचा क्षणभराचा सहवास ही सुखावून टाकतो. कायम स्मरणात राहतो.

हा स्नेह वंचना की,
काहीच आकळेना
आयुष्य ओघळोनी.
मी रिक्तहस्त आहे

कोण कोणासोबत किती काळ राहिले...? याला फारसं महत्त्व नसतं. तर त्याच्या असण्याने, त्याच्या वागण्याने-बोलण्याने माणसाच्या मनावर किती खोलवर परिणाम झाला. हे महत्त्वाचं असतं. कोणताच माणूस चांगला किंवा वाईट नसतो. ती आपली संकल्पना असते. तो आपला दृष्टिकोन असतो. त्याच्या वागण्या-बोलण्याचे पडसाद असतात. सगळीच माणसं, सगळ्याच परिस्थितीत, सारखी वागत नाहीत. तसंच प्रत्येक माणूस प्रत्येकाशी सारखा वागत नाही. व्यक्ती-व्यक्तीनुसार, विविध घटकानुसार, त्याचं वागणं-बोलणं बदलत असतं. माणसाचा स्वभाव वस्तुनिष्ठ नसतो, तर व्यक्तिनिष्ठ असतो. म्हणूनच एकाच माणसाबद्दल प्रत्येकाची वेगवेगळी मते असू शकतात.

काटा रुते कुणाला,
आक्रंदतात कोणी
मज फुल ही रुतावे..
हा दैवयोग आहे

बारीक-सारीक प्रत्येक गोष्टींचा हिशोब आपण ठेवतो. ईश्वराने दिलेल्या 'अमूल्य भेटी'चा हिशोब आपण ठेवत नाही. खरंतर ईश्वराची 'अमूल्य भेट' म्हणजे आपलं 'जीवन'. ते वारेमाप पद्धतीने आपण उधळत असतो. 'टाईमपास' या नावाखाली वाट्टेल ते करतो. कधी विचारच करत नाही की, आपल्या आयुष्यातील प्रत्येक क्षण किती महत्त्वाचा आहे. दिवसा दिवसांनी संपत जाणारी गोष्ट म्हणजे आयुष्य. प्रत्येकाचेच आयुष्य मर्यादित आहे. मर्यादित आयुष्यात जेवढं चांगलं वागता येईल, तेवढं वागलं पाहिजे. जेवढे भरभरून बोलता येईल, तेवढं बोललं पाहिजे. साधं-साधं, सोपं-सोपं, सरळं-सरळं, जीवन जगलं पाहिजे. विनाकारण गुंतागुंत वाढवायची नाही, जेवढे गुंते सोडवता येतील तेवढे सोडवायचे. काही समस्या सुटत नाहीत... तिथे विनाकारण वेळ वाया घालवायचा नाही. आयुष्यात अनेकांच्या स्मरणात राहू, असं जीवन जगायचं.

हसून पहावं, रडून पहावं.
जीवनाकडे माणसाने डोळे भरून पाहावं...
काहीतरी द्यावं, काहीतरी घ्यावं
आपण गेल्यावर....
आपली नाव कोणीतरी काढावं...

एवढं तरी चांगलं जीवन आपण नक्कीच जगायला पाहिजे. आपल्या अनुपस्थितीत आपलं नाव काढल्याने कुणाच्या तरी चेहऱ्यावर हसू यावं. आपण गेल्यावर चार माणसांच्या तरी डोळ्यात पाणी यावं.. शेवटी औटघटकेचे राज्य आहे. कधीतरी जाणार... म्हणून जमेल तेवढं चांगलं वागा.

माणसाला माणसाच्या आयुष्यात कशाची भुरळ पडेल. हे त्याचं त्यालाही माहीत नसतं. म्हणून तर माणसं वहावत जातात. तरीसुद्धा ते आपल्या भ्रमात असतात. प्रवाहासोबत वाहत असले, तरी माझ्यामुळेच हा प्रवाह आहे. हा भ्रम असतो. प्रवाह ओसरल्यावर कळतं, आपल्यामुळे प्रवाह नव्हता. आपण प्रवाहासोबत होतो. हे कळल्यावरही, माणसं जागी होतातच, असं नाही. पुन्हा दुसऱ्या प्रसंगातही ते तसेच वागताना दिसतात. हाच खरा 'मनुष्य स्वभाव' आहे. पुन्हा-पुन्हा चुका होऊ नयेत, म्हणून माणसाने घडणाऱ्या प्रत्येक प्रसंगाकडून, घटनेकडून काहीतरी शिकलं पाहिजे.

कोणती माणसं आपल्या आयुष्यात यावीत, येतील. किती दिवस एकमेकांचा सहवास लाभेल...? हे सगळं सुनिश्चित असतं. तेवढेच दिवस आपण एकमेकांच्या संपर्कात येतो. एकमेकांशी संवाद साधतो. विचारांची देवाण-घेवाण करतो. सुनियोजित दिवशी पुन्हा वेगवेगळ्या रस्त्याने प्रवास सुरू करतो. सोबत राहतात, त्या फक्त आठवणी. त्या एकमेकांची शेवटपर्यंत सोबत करतात. ह्या आठवणी कुणी सांगतो, तर कुणी अजिबात सांगत नाही. याचा अर्थ असा नाही त्यांना काही आठवतच नाही. याउलट असंही असतं.... त्या आठवणींनी त्यांचे मन आजही विचलित होत असतं. म्हणून ते घाबरत असतात त्या आठवणींना... त्या आठवणीतल्या दिवसांना. अर्थात आठवणीसोबत असणाऱ्या त्या माणसाला.....

खरं तर काहीच कारण नसेल, किंवा काही घडलेच नसेल, तर त्याविषयी बोलायला काय हरकत आहे. ज्याअर्थी आपण तो विषय, ती व्यक्ती टाळण्याचा प्रयत्न करतो.... त्याअर्थी त्या विषयाबद्दल, त्या व्यक्तीबद्दल आपल्या मनात अनेक प्रकारचे विचार असतात. अनेक प्रकारच्या भावना, संवेदना असतात. आजही त्यांना तेवढेच महत्त्व असतं. म्हणून आपण टाळत असतो त्या आठवणींना... आठवणीतल्या व्यक्तींना....

बऱ्याच वेळी बोलण्यामुळे होणाऱ्या जखमेपेक्षा, अबोल्याने झालेल्या जखमा अधिक त्रास देतात. एखाद्या माणसासोबत आपण बोलतो... यामागे जेवढे प्रेम, आपुलकी, माया, जिव्हाळा असतो त्याहीपेक्षा ज्या माणसासोबत आपण अबोला धरतो त्यामध्ये या सर्व भावनांचा जास्त समावेश असतो.

काही करू पहातो,
रुजतो अनर्थ तेथे
माझे अबोलणे ही..
विपरीत होत आहे

जसं विनाकारण आपण कुणाला भेटत नाही; तसं विनाकारण आपण कुणाला टाळतही नाही. भेटण्याला जेवढं महत्त्व असतं; त्याहीपेक्षा जास्त महत्त्व टाळण्याला असतं. या सगळ्या भावना आपल्याला अपराधीपणाची जाणीव करून देत असतात. आपल्या चुकांची, आपण केलेल्या अन्यायाची जाणीव करून देतात. समोरच्या निरागस माणसाला आपण कसं फसवलं...? याची आठवण देतात. पैसा, प्रतिष्ठा आणि व्यवहार यापेक्षा भावना फार महत्त्वाच्या असतात. ते आज कळत असतं. आपली 'मतलबी भूमिका' आज ध्यानात आलेली असते. खरंच आपल्या मनात काही नसेल तर आपण खूप मनमोकळेपणाने वागतो.

मनात खोलवर रुजलेल्या अशा जखमांवर कितीही पट्टी बांधली. अशा जखमा कितीही झाकल्या, तरी त्या वेदनाच देतात. जखम असणाऱ्यांना तो दाह कायमच राहतो. जखमेची ठसठस तशीच राहते. त्या आठवणींच्या जखमांवर फक्त आठवणीतलाच माणूस मलम लावू शकतो, फुंकर घालू शकतो. आपण कितीही सुखात असलो. तरी ते सुख त्या माणसाकडे अभिव्यक्त केल्याशिवाय अपूर्ण असतं. अशीच माणसाच्या आयुष्यात आलेली, आणि कायम घर करून गेलेली माणसं... कितीही दूर असली, तरी ती आठवणीच्या रूपात आपल्या सोबत असतात. त्यांचे हे अमूर्त वास्तव्य आपण जपायचं. फक्त कुठल्याच आठवणींची 'जखम' होऊ द्यायची नाही..

सांगू कशी कुणाला?
कळ आतल्या जिवाची
चिरदाह वेदनेचा.
मज श्राप हाच आहे.

याउलट या आठवणींचं बळं निर्माण करायचं. आठवणींना आणि आठवणीतल्या माणसांना कायम स्मरणात ठेवायचं. मात्र एकमेकांच्या चुका विसरून जायचं. माणसं म्हटली की, चुका होणारचं. त्या चुकांना आज काहीच अर्थ नसतो. दोघेही एकमेकांच्या जीवनात सुखी असतात. उगीच त्याच-त्याच गोष्टी उगाळत बसण्यात काहीच अर्थ नसतो. भरभरून बोलुन मन मोकळं करून टाकायचं. मनसोक्त हसायचं. कुणाचं कुणावर किती प्रेम होतं...? याला आज काहीच अर्थ नाही. आजच्या आयुष्यात आपण सुखी आहात का...? हेच महत्त्वाचं आहे. आठवणींना जपा.....आठवणी ताज्या करा...आणि मनापासून म्हणा... अशी पाखरे येती...आणिक स्मृती ठेवुनी जाती...दोन दिसाची रंगत-संगत...दोन दिसाची नाती.

**–मयूर मधुकरराव जोशी,**
विठ्ठल रुक्मिणी नगर, जिंतूर
जि. परभणी
मो. ९७६७७३३५६०

## थोडक्यात...

### ई-चालन संदर्भात १३ सप्टेंबर रोजी लोकअदालत

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड प्रादेशिक परिवहन कार्यालयात प्रलंबित प्रतिवेदन, ई-चालन यासंदर्भात जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्यावतीने शनिवार, दि.१३ सप्टेंबर २०२५ रोजी लोकअदालत आयोजित केली आहे.

प्रलंबीत प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाद्वारे आयोजित केलेल्या या लोकअदालत मध्ये वाहनचालक, मालकांनी उपस्थित रहावे व तडजोड पद्धतीने आपल्या वाहनासंबंधी प्रकरणाचा निपटारा करावा. या उपलब्ध सुविधेचा संबंधितांनी लाभ घ्यावा, असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी नांदेड यांनी केले आहे.

### बिगर व्यावसायिक प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृह योजना

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात उच्च शिक्षण घेणाऱ्या बी.ए., बी.कॉम, बी.एस.सी.,एम.ए.,एम.एस.सी. अशा बिगर व्यावसायिक प्रथम वर्षातील अभ्यासक्रमाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांनी सन २०२५-२६ या वर्षासाठी शासकीय वसतिगृह योजनेचे ऑनलाईन अर्ज https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर १७ ऑगस्ट २०२५ पर्यंत भरावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याणचे सहाय्यक संचालक शिवानंद मिनगिरे यांनी केले आहे.

इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत राबविण्यात येत असलेल्या विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृह योजना सुरू आहे. वसतिगृहात प्रवेशित विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकरिता भोजन निवास व शैक्षणिक साहित्यासाठी त्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यामध्ये थेट रक्कम वितरीत करण्यात येते.

# 'यशवंत'मध्ये संगीत विभागात सत्रारंभ कार्यक्रम उत्साहात संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)–** श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित यशवंत महाविद्यालयातील संगीत विभागात 'संगीत कलेच्या माध्यमातून मिळणाऱ्या व्यवसायाच्या संधी' या विषयावर स्वरसंगम संगीत कार्यक्रम उत्सासात संपन्न झाला. कार्यक्रमात विद्यालयाच्या संचालिका व अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालय मंडळाच्या महामहोपाध्याय पदवी प्राप्त सीता राममोहन राव व डॉ.दिपाली पांडे, संगीत विभाग प्रमुख पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय, राणीसावरगाव यांचे विशेष व्याख्यान पार पडले.

माजी प्र-कुलगुरू प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन.शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार आयोजित व्याख्यानाच्या अध्यक्षपदी उपप्राचार्य डॉ. कविता सोनकांबळे उपस्थित होत्या.

सुरुवातीला संगीत विभागातील बी.ए. द्वितीय आणि तृतीय वर्षांच्या विद्यार्थ्यांनी शारदास्तवन या गीताचे सादरीकरण केले. यामध्ये माधवी मठपती, दुर्गा जगदंबे, नेहा थोरात, उदय जाधव आदी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

सीता राममोहन राव यांनी संगीत कलेचा रियाज कसा करावा, राग कसा ऐकावा व तो आत्मसात कसा करावा, याबद्दल सखोल मार्गदर्शन केले तर संगीत कला हे फक्त उपजीविकेचे साधन नसून व्यक्तिमत्व विकासाचे सशक्त माध्यम आहे असे प्रतिपादन डॉ. दिपाली पांडे यांनी केले.

कार्यक्रमामध्ये श्रीमती सीता भाभी यांना अत्यंत मानाची, प्रतिष्ठेची महामहोपाध्याय ही पदवी मिळाल्याबद्दल संगीत विभागाच्या वतीने शाल, श्रीफळ पुष्पगुच्छ व सरस्वतीदेवीची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला.

संगीत विभागप्रमुख डॉ.एस. व्ही. शिंदे यांनी प्रास्ताविक केले तर पाहुण्यांचा परिचय प्रा.संगीता चाटी यांनी करून दिला. सूत्रसंचालन जुई या विद्यार्थिनीने केले तर आभार नेहा थोरात या विद्यार्थिनीने मानले.

कार्यक्रमास बी.ए प्रथम वर्षाचे संगीत, स्कील संगीत, जेनेरिक इलेक्टिव्ह संगीत, तसेच बी.ए. द्वितीय व तृतीय वर्षाचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमात बी.ए.तृतीय शिक्षण पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ सुद्धा पार पडला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपप्राचार्य डॉ.हरिश्चंद्र पतंगे, डॉ. अजय गव्हाणे, प्रबंधक संदीप पाटील, अधीक्षक कालिदास बिरादार, गजानन पाटील, जगन्नाथ महामुने, संजय जाधव यांनी परिश्रम घेतले.

# 'बम बम भोले..'च्या गजरात श्रीक्षेत्र राहेर ते सिद्धेश्वर मंदिर नरसी कावडयात्रा संपन्न



**नरसीफाटा (प्रतिनिधी)–** श्रावणमास निमित्ताने नरसीच्या सिद्धेश्वर मंदिरात धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असून मंदिरात भाविकांची मोठी गर्दी होत आहे. श्रावण महिन्याच्या पावन - पर्वावर 'बम बम भोले..' 'हरहर महादेव..'च्या गजरात श्रीक्षेत्र राहेर ते सिद्धेश्वर महादेव मंदिरदरम्यान नरसी भक्तीमय वातावरणात कावडयात्रा संपन्न झाली.

यंदा श्रावण महिन्यात चार सोमवार आहेत. त्यानिमित्ताने प्रत्येक महादेव मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. नरसी-धानोरा दरम्यान असलेल्या महादेव मंदिरात भाविकांची मोठी गर्दी होतांना दिसत आहे. नरसी येथील शिवभक्त कै. विश्वनाथ सावकार आक्कमवाड यांच्या संकल्पनेतून सिध्देश्वर नगरात भव्य महादेव मंदिर बांधण्यात आले आहे. हे मंदिर भाविकांचे श्रध्दास्थान बनले आहे. येथे दरवर्षी कावडयात्रेचे आयोजन करण्यता येते. यावर्षी कावडयात्रेचे हे तिसरे वर्षे आहे. ही कावडयात्रा श्रीक्षेत्र राहेर ते सिद्धेश्वर महादेव मंदिर नरसी दरम्यान काढण्यात आली. या यात्रेत भाविकांची मोठी गर्दी पहावयास मिळाली. यात्रेतील अश्वारूढ महादेवांची मुर्ती हे भाविकांचे आकर्षण ठत होती. डी.जे.च्या भक्तीमय गीतांवर व टाळमृदंगाच्या गजरात भाविक ठेका धरत होते. ही कावडयात्रा वे.शा.सं. संदीप महाराज जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली काढण्यात आली. या कावडयात्रेची सांगता सिद्धेश्वर महादेव मंदिरात महाअभिषेक व म हाप्रसादाने करण्यात आली.

या यात्रेत श्रावण पाटील भिलवंडे, माणिकराव लोहगावे, राजेश पाटील भिलवंडे, सुभाष पेरकेवार, साईनाथ अक्कमवाड, कैलास तेलंग, गोविंद नरसीकर, सोमेश शेटकर, अंकुश खणपट्टे, पांडुरंग बागडे, भिमराव राठोड, मद्रेवार, पप्पू आक्कमवाड, अनिल शिरमवार, विठ्ठल चिंद्रावार, संदीप भिलवंडे, विनोद भिलवंडे, बबलू बच्चेवार, नारायण देवशेटवार, संतोष जुक्कलकर, मारोती बुक्के, पवन गादेवार, रामायणाचार्य रामकिशन महाराज राजलवाड, नंदेश्वर कोरे, भास्कर कोकणे, भीमराव भवरे, संतोष जुक्कलकर यांच्यासह महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

# क्रीडांगण व व्यायामशाळा विकासासाठी योजनेसाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

## १४ ऑगस्टपर्यंत अर्ज वाटप व प्रस्ताव स्वीकारणार

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्यात क्रीडा संस्कृतीचे संवर्धन व प्रचार-प्रसार यासाठी पोषक वातावरण निर्मिती करण्याच्या उद्देशाने सन २०१२ पासून राज्य क्रीडा धोरण राबवले जात आहे. या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नांदेड यांचेमार्फत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता क्रीडांगण विकास व व्यायामशाळा विकास योजना अंतर्गत १४ ऑगस्टपर्यंत प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

क्रीडांगण विकास योजनेत एकूण १३ बाबींचा समावेश असून, विविध सुविधा उभारणीसाठी संस्थांना व्यायामशाळा विकास योजनेत व्यायामशाळेचे बांधकाम, अद्ययावत साहित्य खरेदी किंवा खुली जिम उभारणी यासाठी साहित्य/अनुदान देण्यात येणार आहे.

सदर योजनेसाठी विहित नमुन्यातील अर्ज १४ ऑगस्टपर्यंत (सुटीचे दिवस वगळून) जिल्हा क्रीडा संकुल, इनडोअर हॉल, नांदेड येथील क्रीडा अधिकारी कार्यालयात उपलब्ध होतील व तेथेच स्वीकारले जातील.

अर्ज मागविण्याच्या वेळी संस्थेचे दोन्ही नोंदणी प्रमाणपत्रांची सत्यप्रती किंवा संस्थेच्या लेटरहेडवर अर्ज मागणी पत्र सादर करणे आवश्यक आहे. त्यानंतरच अर्ज वितरित करण्यात येतील, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांनी केले आहे.

# स्वातंत्र्यदिनी सौर ग्रामदिन साजरा होणार

**नांदेड (प्रतिनिधी)–** संपूर्ण राज्यात यावर्षी १५ ऑगस्ट रोजी सौर ग्रामदिन साजरा करण्यात येणार आहे. नांदेड, परभणी आणि हिंगोली जिल्हयातही सर्वत्र सौर ग्रामदिन व्यापक प्रमाणात साजरा करण्याचे निर्देश महावितरणे मुख्य अभियंता राजाराम माने यांनी विद्युत यंत्रणेस दिले आहेत.

प्रधानमंत्री सुर्यघर मोफत वीज योजना २९ फेब्रुवारी २०२४ पासून राबविण्यात येत आहे. घराच्या छतावर सौरपॅनल आस्थापीत करुन वीज निर्मिती करण्याची ही योजना आहे. ७८ हजार रुपयापर्यंतचे अनुदान असणारी ही योजना लाभार्थ्याचे वीजबिल शुन्यावर आणणारी आहे. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व तिच्या प्रभावी प्रसारासाठी १५ ऑगस्ट २०२५ रोजी गावोगावी सौर ग्रामदिनाचे आयोजन करण्यात येणार आहे. सौरग्राम दिना निमित्ताने प्रत्येक ग्रामपंचायतीत ग्राम सभा घेण्याचेही शासन आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

योजनेच्या प्रभावी प्रसारणासाठी ग्राम सभांसह मुद्रीत, ईलेक्ट्रॉनिकसह सोशल मीडियाच्या माध्यमातूनही जनजागृती करण्यात येणार आहे. स्थानिक बाजारपेठा, यात्रा महोत्स्व , तसेच शाळा व स्थानिक आस्थापनांच्या माध्यमातूनही योजनेचा व्यापक प्रसार करण्यात येईल. जनतेच्या दारोदारी ही योजना नेण्यासाठी प्रदर्शने, प्रशिक्षण, रॅलीज आयोजित करण्याचे शासन आदेश असल्याने त्यानिमित्ताने सर्वत्र योजनेचा जागर होणार आहे. या योजना प्रसारण मोहीमेत वीज अभियंते व कर्मचारी यांनीही आपला उत्स्फुर्त सहभाग नोंदविण्याचे आवाहन मुख्य् अभियंता राजाराम माने यांनी क्षेत्रिय कार्यालयाना केले आहे.

# जैवविघटनक्षम बायोप्लास्टिकच्या संशोधनासाठी प्रा. डॉ. दीपक भुसारे यांना पेटंट

**नांदेड (प्रतिनिधी)–** हॅलोअल्कॅलिफिलिक मायक्रोबियल पीएचबी, सोया प्रथिने, ग्लिसेरॉल आणि अगार-अगार बाइंडरपासून जैवविघटनशील बायोपॉलिमर या शीर्षकाखाली एक नवे जैवविघटनक्षम बायोप्लास्टिकच्या संशोधनासाठी प्रा.डॉ. दीपक भुसारे यांना भारत सरकारकडून पेटंट मिळाले आहे.



भोकर येथील दिगंबरराव बिंदू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. दिपक उत्तमराव भुसारे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी एक महत्त्वपूर्ण संशोधन करत हॅलोअल्कॅलिफिलिक मायक्रोबियल पीएचबी, सोया प्रथिने, ग्लिसेरॉल आणि अगार-अगार बाइंडर पासून जैवविघटनशील बायोपॉलिमर या शीर्षकाखाली एक नवे जैवविघटनक्षम बायोप्लास्टिक तयार केले असून, त्याचे भारत सरकारकडून त्यांना पेटंट मिळाले आहे. या संशोधनात मो. उरुज मो. इद्रीस, डॉ. प्रशांत वक्ते, डॉ. सागर साकळे, सौ. मंजिरी भाटे, डॉ. संजीवकुमार क्षीरसागर, डॉ. प्रकाश कंठाळे, डॉ. अरविंद उमरीकर, डॉ. अरविंद चव्हाण, डॉ. रेणुका जोशी, शंतनू मिश्रा आणि श्रीमती सरिता जिंतुरकर यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

या संशोधनात मो. उरुज मो. इद्रीस, डॉ. प्रशांत वक्ते, डॉ. सागर साकळे, सौ. मंजिरी भाटे, डॉ. संजीवकुमार क्षीरसागर, डॉ. प्रकाश कंठाळे, डॉ. अरविंद उमरीकर, डॉ. अरविंद चव्हाण, डॉ. रेणुका जोशी, शंतनू मिश्रा आणि सरिता जिंतुरकर यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

# महसूल सप्ताहानिमित्त कुंडलवाडीच्या शिबिरात अनेकांना प्रमाणपत्राचे वाटप

**कुंडलवाडी (प्रतिनिधी)–** कुंडलवाडी येथे महसूल सप्ताहानिमित्त शिबिर आयोजित करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थी, नागरिकांना विविध शासकीय प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.



या शिबिरात नागरिकांना ग्रीस्टग राशन कार्ड, सातबारा उत्पन्न प्रमाणपत्र, श्रावणबाळ योजनेचे डीबीटी करणे अशा विविध प्रकारचे प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. याप्रसंगी उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे, तहसीलदार गजानन शिंदे, नायब तहसीलदार परळीकर, सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे, मंडळ अधिकारी जिगळे, ग्राम महसूल अधिकारी पवन ठकरोड, सेवानिवृत्त मंडळ अधिकारी गंगाधर खेळगे, भगवान कांबळे, राजू गाडेकर, शरद पाटील, शिवलिंग वागमारे, भाजपचे शहराध्यक्ष हणमंलू इरलावार, साहेबराव कोंडावार, पोलीस पाटील संतोष शिवशेटे, साईबाबा डोंगरे, कृष्णा तुंगेनवार, संजय गंडरोड, राजू श्रीरामे आदी उपस्थित होते.

# उमरीत हुतात्मा उत्तरवार सभागृहाचे आ. पवार यांच्या हस्ते लोकार्पण

**उमरी (प्रतिनिधी)–** उमरी भागातील क्रांतिकारांनी निजामी राजवटी विरुद्ध मोठा संघर्ष केला. स्वातंत्र्य संग्रामातील त्यांचे योगदान, त्यांचा इतिहास कायम स्मरणात राहावा म्हणून आपण प्रयत्नशील राहणार असल्याचे प्रतिपादन आ. राजेश पवार यांनी केले. उमरी येथील तहसील आवारामध्ये हुतात्मा दत्तात्रेय देविदासराव उत्तरवार यांचे नाव देऊन या सभागृहाचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.



यावेळी माजी जि.प. सदस्या पूनमताई पवार, उपविभागीय अधिकारी स्वाती दाभाडे, गटविकास अधिकारी व्ही. आर. आरबडवाड, तहसीलदार मंजुषा भगत, न.प. मुख्याधिकारी गणेश चाटे, नायब तहसीलदार संजय सोलनकर, पोलीस निरीक्षक अंकुश माने, सा.बां. चे उपअभियंता नरवाडे, जुगल जाधव, महावितरणचे उपअभियंता एस. व्ही. जगदाळे, स्वातंत्र्य सेनानी जानकाबाई माने, सुंदरबाई क्षीरसागर, सरस्वतीबाई गळगे, श्यामाबाई सावंत आदींची प्रमुख उपस्थिती होती.

मराठवाडा मुक्ती संग्राम लढ्यात संपूर्ण देशात ऐतिहासिक ठरलेल्या उमरी बँक ऑपरेशनचा इतिहास भावी पिढीला सम जावा. त्यापासून राष्ट्रभक्ती व देशावरील निष्ठा कायम राहण्याच्या दृष्टीने प्रेरणा मिळावी. यासाठी उमरी येथे सुसज्ज असे डिजीटल स्मारक उभारण्याचा मनोदय आमदार पवार यांनी व्यक्त केला. कार्यक्रमात स्वातंत्र्य सैनिक व त्यांचे वारस मोहन उत्तरवार, सुभाष पेरेवार, अशोकराव संगेवार, योगेश शर्मा, प्रकाश पुणेबोईनवाड यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी, युवानेते बापूसाहेब पाटील कौडगावकर, पारसमल दरडा, डॉ. विक्रम देशमुख, ज्ञानेश्वर सावंत, प्रभाकर पुयड आदी उपस्थित होते.

# गोदावरी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेत सीकेवायसी विषयावर प्रशिक्षण

**नांदेड (प्रतिनिधी)–** गोदावरी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. वजिराबाद नांदेड यांनी सभासद प्रशिक्षण कार्यक्रम हे सभासदांना प्रशिक्षण काळाची गरज व सीकेवायसी या विषयावर गोदावरी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. वजिराबाद, नांदेड मुख्य कार्यालय येथे दि. ३ ऑगस्ट रोजी सकाळी १०.३० वाजता आयोजित केला होता.

सदरील कार्यक्रमाचे अध्यक्ष हे बँकेचे ज्येष्ठ सभासद अरविंद नारलावार हे होते. तसेच कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कांचन आर. परिहार यांनी केले. तसेच कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा.डॉ.आर. डी. देशमुख हे होते. प्रा.डॉ.आर.डी. देशमुख यांनी सभासदांना प्रशिक्षण काळाची गरज व सीकेवायसी या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष अरविंद नारलावार यांनी अध्यक्षीय समारोप केले तर आभार प्रदर्शन बँकेचे शाखा व्यवस्थापक पुंडलिक पावडे यांनी केले.

### साईबाबा मित्र मंडळाच्यावतीने महाप्रसादाचे आयोजन

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** साईबाबा मित्र मंडळ कौठा नांदेड यांच्यावतीने श्रावणमासनिमित्त साईबाबा मंदिर कौठा येथे दि. ७ ऑगस्ट रोजी विधीवत महापुजा व महाआरतीनंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

गुरूवारी दुपारी १२ वाजता महाआरती झाल्यानंतर उपस्थित भाविक भक्तांनी व वसरणी परिसरातील अंध शाळेतील विद्यार्थ्यांना या महाप्रसादाचा लाभ घेतला. महाप्रसाद निमित्ताने विनोद काकडे यांनी साईबाबांचे विधीवत पूजन करून महाअभिषेक केला. माजी जिल्हा परिषद सदस्य गंगाप्रसाद धोंडिबाराव काकडे, अशोक बाबुराव दिलेराव, हेमराज सागर लड्डा, माधव रामराव गुरू पवार, रमेश हरिचंद्र यादव, आकाश आणि साकेत व्यवहारे यांच्यावतीने या महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

# साठे, टिळक प्रखर मानवतावाद आणि राष्ट्रवादाचे पुरस्कर्ते -प्राचार्य डॉ. शेखर घुंगरवार



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्राच्या मराठी साहित्य परंपरेतील एक महत्त्वाचे लेखक अण्णाभाऊ साठे यांनी मार्क्सवादी विचाराचा अंगीकार करून वास्तववादी लेखन केले. आपल्या साहित्यातून त्यांनी उपेक्षित आणि प्रवाह पतितांच्या व्यथा आणि वेदना साकार केल्या आणि मानवतावादी विचारांशी प्रामाणिक राहिले तर प्रखर राष्ट्रवादी नेते लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामात अमूल्य योगदान देऊन प्रखर क्रांतिकारी लढा उभारला. त्यामुळे अण्णाभाऊ साठे आणि लोकमान्य टिळक हे प्रखर मानवतावाद आणि राष्ट्रवादाचे कट्टर पुरस्कर्ते होत, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.शेखर घुंगरवार यांनी वसंतराव नाईक महाविद्यालय वसरणी नांदेड येथे आयोजित कार्यक्रमात केले.

येथील वसंतराव नाईक महाविद्यालयात साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती आणि असंतोषाचे जनक लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथी निमित्त निमित्त अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रम ाच्या अध्यक्ष स्थानावरून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेखर घुंगरवार बोलत होते.

अभिवादन कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. सतिश शेटे यांची उपस्थिती होती. याप्रसंगी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. उपप्राचार्य डॉ. व्ही. आर. राठोड कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.एन. पी.दिंडे, डॉ एस. व्ही.शेटे आणि से.नि.कार्यालयीन अधिक्षक आर.डी.राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.साहेबराव शिंदे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा.शशीकांत हाटकर यांनी केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्रो.डॉ.रेणुका मोरे, प्रो.डॉ.नागेश कांबळे, प्रा.डॉ. दिलिप पालीम कर, डॉ.अनिल गच्चे, डॉ.गणेश लिंगमपल्ले, डॉ.संजय गिरे, डॉ.उत्तम कानवटे, डॉ.आर.एम.कागणे, डॉ. साहेबराव मोरे, प्रा.जायदे, प्रा.नंदिनी सुधळकर, प्रा. माधव मुस्तापुरे, प्रा.शेख, प्रा.कोतवाल, डॉ.शोभा वाळुक्कर, डॉ.धारबा रणवीर, डॉ.लालबा खरात, प्रा.कपील हिंगोले, डॉ.गणेश ईजळकर, प्रा.समाधान दराडे, प्रा.ललिता आया, प्रा.राहुल पडोळे यांसह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक-शिक्षकेतर कर्मचारी व सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी यांची उपस्थिती होती.

# महापारेषणचे चार नाही, तर चाळीस भ्रष्ट अधिकाऱ्यांना बडतर्फ करण्याची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** महापारेषण मधील चार वरिष्ठ अधिकारी निलंबित झाले आहेत. केवळ चार नाही तर आणखी किमान चाळीस भ्रष्ट अधिकारी निलंबित नाही तर बडतर्फ करावेत, अशी मागणी अखिल भारतीय बहुजन समता परिषदेचे नेते इंजि. चंद्रप्रकाश देगलूरकर यांनी केली आहे.

विद्युत सहाय्यक भरती प्रक्रियेत अनियमितता झाल्याच्या कारणावरून महापारेषण विद्युत कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीवकुमार यांनी मुख्यालयातील मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) सुगत गमरे, महाव्यवस्थापक मंगेश शिंदे, उपमहाव्यवस्थापक अभय रोही आणि वरिष्ठ व्यवस्थापक संदिप धाबर्डे यांना तडकाफडकी निलंबित केले आहे. डॉ. संजीवकुमार यांच्या या तात्काळ कारवाईचे अ. भा. बहुजन समता परिषदेने स्वागत केले असून या भरती प्रकरणी आणखी व्यापक चौकशी करुन मुख्य अभियंता, अधिक्षक अभियंता आणि कार्यकारी अभियंता कार्यालय स्तरापर्यंत पसरलेली भ्रष्टाचाराची पाळेमुळे खोदून काढून आणखी जवळपास चाळीस भ्रष्ट अधिकाऱ्यांना केवळ निलंबित नाही तर बडतर्फ करुन घरचा रस्ता दाखविण्यात यावा अशी मागणी अ. भा. बहुजन समता परिषदेने लेखी निवेदनातून केली आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांना ईमेल व ऑनलाईन पोर्टलवर पाठविलेल्या निवेदनात अ. भा. बहुजन समता परिषदेचे नेते इंजि. चंद्रप्रकाश देगलूरकर यांनी महापारेषण विद्युत कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीवकुमार यांचे अभिनंदन केले असून वर्षानुवर्ष एकाच कार्यालयात ठाण मांडून बसलेले श्री सुगत गमरे व त्यांची मानव संसाधन विभागाची टीम भ्रष्टाचारात आकंठ बुडाली होती. विद्युत सहाय्यक भरतीतून त्यांचा भरत आलेला पापाचा घडा फुटला. आणखी सविस्तर चौकशी होऊन भरतीपासून ते नियुक्तीपर्यंत होत असलेल्या विभागीय कार्यालयापर्यंतच्या भ्रष्टाचाराचीही चौकशी करण्याची मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे.

विद्युत सहायक हे कायम स्वरुपी कर्मचारी नसून तीन वर्षापर्यंत अल्पशा मानधनावर काम करण्यास तयार झालेले मजबूर युवक असून त्यांच्या नियुक्तीपासून ते पदस्थापनेपर्यंत भ्रष्टाचार होत आला आहे. यासाठीच परिमंडळाच्या बाहेर नियुक्त्या देऊन नंतर हव्या त्या ठिकाणी पदस्थापना देऊन पैसे उकळण्याचा बेत आखण्यात येत असतो. याचीही चौकशी झाली पाहिजे, अशीही मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे.

# अंतर्मन

# १८ वर्षांनंतर सिंह राशीत सूर्य-केतूची युती

**मेष राशीसह ५ राशी धनवान होतील, संपत्ती वाढेल!**

सिंह राशीत सूर्याचे संक्रमण होणार आहे. अशा परिस्थितीत १८ वर्षांनंतर सिंह राशीत सूर्य आणि केतूची युती होईल. केतू सध्या सिंह राशीत भ्रमण करत आहे. १७ ऑगस्ट रोजी सूर्य सिंह राशीत भ्रमण करेल. सूर्य आणि केतूच्या युतीमुळे ग्रहण योग तयार होईल, जो ज्योतिषशास्त्रात शुभ मानला जात नाही, परंतु, या वेळी सूर्य स्वतःच्या राशीत सिंह राशीत भ्रमण करताना मजबूत स्थितीत असेल. मजबूत स्थितीत असल्याने सूर्य केतूचे प्रतिकूल परिणाम कमी करेल. ज्यामुळे मेष, सिंह राशीसह ५ राशींना फायदा होईल. ज्योतिष नियमांनुसार, केतू आणि सूर्याची युती काही घरांमध्ये अनुकूल परिणाम देणारी असल्याचे म्हटले जाते. अशा परिस्थितीत, सूर्य आणि केतूच्या युतीमुळे या ५ राशींना करिअरमध्ये यश तसेच पैशाचा लाभ मिळेल.



## मेष : प्रेम जीवनात चांगली बातमी

सूर्य आणि केतूची युती मेष राशीच्या पाचव्या घरात होईल. अशा परिस्थितीत मेष राशीच्या लोकां चे प्रेम जीवन खूप चांगले राहील. ज्यांना त्यांचे नाते विवाहात रूपांतरित करायचे आहे त्यांना आता कुटुंबातील सदस्यांची मान्यता मिळू शकते. या काळात तुम्हाला उच्च शिक्षणात यश मिळू शकते. त्याच वेळी, नोकरी करणाऱ्या लोकांना या काळात त्यांची प्रतिभा दाखविण्याची संधी मिळेल. ज्यामुळे काही मोठे यश मिळू शकते.

## सिंह : उत्पन्नाचे स्त्रोत वाढतील

सिंह राशीच्या लोकांसाठी सूर्य आणि केतूची युती खूप प्रभावी ठरेल. या काळात सूर्य आपल्या राशीत सिंह राशीत बसून मजबूत स्थितीत असेल. अशा परिस्थितीत तुम्ही मानसिकदृष्ट्या खूप मजबूत व्हाल. नोकरी करणाऱ्या लोकांना त्यांच्या कामात मान्यता मिळू लागेल. सूर्य केतूची युती करिअरसाठी खूप चांगली आणि शुभ ठरेल. कामात मान्यता मिळण्यासोबतच, नोकरी करणाऱ्या लोकांचा आदरही वाढेल. तुम्हाला चांगले आर्थिक लाभ मिळू शकतात. यासोबतच तुमच्यासाठी उत्पन्नाचे नवीन स्त्रोत देखील निर्माण होऊ शकतात. या काळात तुमच्या नातेवाईकांसोबतचे जुने मतभेद दूर होतील.

## तूळ : लोकांना करिअरमध्ये यश

तुळ राशीच्या लोकांसाठी आर्थिक आणि व्यावसायिक बाबींमध्ये सूर्य आणि केतूची युती खूप अनुकूल राहणार आहे. व्यवसाय करणाऱ्या या राशीच्या लोकांना बऱ्याच काळापासून ज्या काही समस्या येत होत्या, त्या सर्व दूर होतील. कामातील अडथळे आता दूर होतील आणि काम गती घेईल. या काळात सूर्य आणि केतुच्या कृपेने यशाकडे वाटचाल कराल. एवढेच नाही तर संपत्तीचे नवीन स्त्रोत देखील निर्माण होऊ शकतात. एखाद्या वरिष्ठ किंवा प्रभावशाली व्यक्तीचे सहकार्य मिळू शकते. तुम्ही तुमच्या भविष्याला एक नवीन दिशा द्याल.

## वृश्चिक : लोक होतील भाग्यवान

सूर्य आणि केतुची युती वृश्चिक राशीच्या लोकांच्या दहाव्या घरात असेल. कामाच्या ठिकाणी तुमच्या कठोर परिश्रमाचे कौतुक होईल. समाजात तुमची प्रतिष्ठादेखील वाढेल. तुम्हाला अधिक यश, समृद्धी आणि कीर्ती जाणवेल. या काळात तुम्ही तुमचे सर्व काम अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने कराल, जे पाहून तुमच्या कुटुंबातील सदस्यही तुमच्यावर आनंदी होतील.

## मकर : लोकांना करिअरमध्ये यश

मकर राशीच्या लोकांसाठी सूर्य केतूच्या युतीमुळे करिअर, शिक्षण आणि व्यवसायात प्रगती होऊ शकते. नोकरी करणाऱ्यांच्या कामाचे कौतुक होईल. तुमचे अधिकारी तुमच्यावर खूप दयाळू असतील. ते तुम्हाला पाठिंबा देतील. तुम्हाला पदोन्नती मिळू शकेल. इतकेच नाही तर या काळात तुमची कमाईही पूर्वीपेक्षा खूप चांगली होईल. तुम्हाला नवीन जबाबदाऱ्या सोपवल्या जाऊ शकतात. ज्या तुम्ही चांगल्या प्रकारे पार पाडाल. जे लोक कोणत्याही कायदेशीर बाबींमध्ये अडकले होते, ते आता बाहेर पडू लागतील. तुमच्या जुन्या योजना सुरू करण्यासाठी हा काळ खूप चांगला आहे, तुमच्यासाठी ही एक सुवर्णसंधी असू शकते.



# घराची बाल्कनी सकारात्मक उर्जेचा स्रोत!

**वास्तुशास्त्राच्या दृष्टिकोनातून घराची बाल्कनी महत्त्वाची आहे. बाल्कनी वास्तुशास्त्रानुसार बांधली गेली असेल आणि त्याची देखभाल देखील वास्तु सूचनांनुसार केली गेली असेल, तर ती संपूर्ण घराला किंवा फ्लॅटला सकारात्मक ऊर्जा प्रदान करण्यात महत्त्वाची भूमिका बजावते.**



- जेव्हा बाल्कनी पूर्वेला असते : जर बाल्कनी पूर्वेला बांधली गेली असेल, तर ती तुमच्या संपूर्ण घरासाठी फायदेशीर असते आणि घरात सकारात्मक ऊर्जा प्रसारित करण्यासाठी ती शक्य तितकी स्वच्छ ठेवा. या दिशेकडून सकाळी सूर्यदेवाचे सकारात्मक किरण तुमच्या घरात प्रवेश करतात, म्हणून येथे मोठ्या आणि जड वस्तू ठेवू नका. येथे तुळशीचे रोप ठेवा. पण खूप जड भांडी ठेवू नका. कोणतेही तुटलेले घरगुती सामान, कचरा इत्यादी ठेवू नका. सूर्याला जल अर्पण करण्यासाठी या बाल्कनीच्या मधल्या भागाचा वापर करा.
- जेव्हा बाल्कनी पश्चिमेला असेल : जर तुमच्या घरात किंवा फ्लॅटमध्ये पश्चिमेला बाल्कनी असेल, तर दुपारनंतर ती पडद्याने झाकले पाहिजे. कारण वास्तुनुसार, पश्चिमेकडूनच कमकुवत किंवा नकारात्मक ऊर्जा प्रवेश करते. तुम्ही येथे आकार आणि वजनानुसार काही जड भांडी आणि वनस्पती वापरू शकता.
- जेव्हा बाल्कनी उत्तरेकडे असेल : जर तमच्या घराची किंवा फ्लॅटची बाल्कनी उत्तरेकडे बांधली असेल, तर ती पूर्वेकडील बाल्कनीइतकीच स्वच्छ ठेवा. जर तुम्हाला बांधकाम सुरू असलेल्या घरात तुमच्या आवडीनुसार बाल्कनी बांधण्याचे स्वातंत्र्य असेल, तर पूर्व, उत्तर आणि ईशान्येकडील ईशान्य कोपऱ्यात मोठी बाल्कनी बांधणे वास्तूनुसार आहे. अशा बाल्कनीमुळे इमारतीला विस्तृत पाया आणि सकारात्मक ऊर्जा मिळते.
- जेव्हा बाल्कनी दक्षिण दिशेला असेल : जर बाल्कनी घराच्या दक्षिण दिशेला किंवा सपाट भागात बांधली असेल तर येथे विविध प्रकारच्या उंच आणि लटकणाऱ्या फुलांचे किंवा सजावटीच्या वेलींचे रोप लावा. दक्षिण दिशेला असलेल्या बाल्कनीच्या एका भागात, तुम्ही अशा काही वस्तू ठेवू शकता ज्या सध्या वापरण्याची तुम्हाला गरज नाही. जर दक्षिण दिशेला असलेली बाल्कनी घराचा पुढचा भाग असेल, तर ही बाल्कनी तुलनेने मोठ्या वनस्पतींनी सजवता येते.

### वैश्विक ऊर्जेचा प्रवेश

बाल्कनी कोणत्याही दिशेने बांधली असली तरी ती नेहमीच स्वच्छ असावी, कारण सहसा तिथे एक किंवा अधिक खिडक्या आणि दरवाजे असतात आणि वैश्विक ऊर्जा नेहमीच घराच्या खिडक्या आणि दरवाज्यांमधून घरात प्रवेश करते. आता जर उर्जेचा प्रवेश करण्याचा मार्ग स्वच्छ नसेल तर आपल्या घरात नकारात्मक लहरी येतील. ज्यामुळे घरात अशांततेचे वातावरण निर्माण होऊ शकते.





**रक्षाबंधनाचा सण भाऊ आणि बहिणीसाठी खास आहे. या दिवशी प्रत्येक बहीण आपल्या भावाच्या मनगटावर राखी बांधते आणि त्याच्या आयुष्यात सुख आणि समृद्धीची कामना करते. त्याचबरोबर रक्षाबंधनाच्या दिवशी देवांना राखी बांधण्याचेही विशेष महत्त्व आहे. जर तुम्ही या खास प्रसंगी सकाळी राखी बांधण्यासोबत काही सोपे उपाय केले तर ते भाऊ आणि बहिणीच्या जीवनात आनंद आणू शकते. जीवनात प्रगती, संपत्ती आणि सौभाग्य प्राप्त होते. चला या उपायांबद्दल सविस्तरपणे जाणून घेऊया...**

# रक्षाबंधनला सकाळी लवकर करा हे उपाय करा...

## भाऊ अन् बहिणीच्या आयुष्यात होईल खूप प्रगती!



भावाला राखी बांधण्यापूर्वी सकाळी लवकर उठून स्नान करावे. त्यानंतर, देवाची पद्धतशीर पूजा करावी आणि सर्व राख्या आरतीच्या ताटात ठेवाव्यात. त्यात चांदीचे नाणे ठेवावे. जर हे शक्य नसेल तर तुम्ही एक रुपयाचे नाणेदेखील ठेवू शकता. आता भगवान गणेशाला राखी बांधा आणि ते नाणे मंदिरात ठेवा. दुसऱ्या दिवशी मंदिरात पूजा केल्यानंतर ते नाणे लाल कपड्यात बांधून तुमच्या तिजोरीत ठेवा. यामुळे जीवनातील पैशाची समस्या दूर होऊ शकते आणि संपत्ती वाढू शकते.

- जीवनात प्रगती मिळविण्यासाठी उपाय : असे मानले जाते की रक्षाबंधनाच्या दिवशी प्रथम भगवान शिवाचा अभिषेक करावा. यामुळे खूप शुभ परिणाम मिळतात. यासाठी तुम्ही दूध, दही, मध, तूप आणि साखरेने महादेवाचा अभिषेक करू शकता. त्यानंतर विधीपूर्वक पूजा केल्यानंतर भगवान शिवाला राखी बांधा. हा उपाय केल्याने जीवनात प्रगती मिळू शकते आणि भावा-बहिणींच्या जीवनातून सर्व प्रकारचे त्रासही दूर होऊ लागतात.
- सुख, शांती आणि समृद्धीसाठी... : सकाळी उठून स्नान केल्यानंतर स्वच्छ कपडे घाला आणि देवी लक्ष्मी आणि गणेशाची योग्य पद्धतीने पूजा करा. तसेच ओम श्रीं ह्रीं श्रीं महालक्ष्म्यै नमः या मंत्राचा १०८ वेळा जप करा. तसेच ओम गं गणपतये नमः या मंत्राचा १०८ वेळा जप करा. हा उपाय केल्याने व्यक्ती घरातील समस्यांपासून मुक्त होऊ शकते आणि जीवनात सुख, शांती आणि समृद्धी राहते. हा उपाय केल्याने माता लक्ष्मीचे विशेष आशीर्वाद देखील प्राप्त होतात.



- कुटुंबाचे रक्षण करण्यासाठी... : रक्षाबंधनाच्या दिवशी भाऊ-बहिणी आणि कुटुंबाचे रक्षण करण्यासाठी मोहरी, केशर, सोने किंवा एक रुपयाचे नाणे, चंदन, अक्षता आणि दुर्वा रेशमी कापडात गुंडाळा. आता रंगीत धाग्याने कापड बांधा आणि ते तुमच्या घरातील देव्हाऱ्यासारख्या पवित्र ठिकाणी ठेवा. यासाठी तुम्ही कलश स्थापित करू शकता आणि त्यावर ते ठेवू शकता. त्यानंतर विधीपूर्वक पूजा करा. हा उपाय केल्याने कुटुंबात आनंद राहतो.

# जिभेवरून कळतात रहस्ये



**हस्तरेषाशास्त्र आणि सामुद्रिक शास्त्रात व्यक्तीचे जीवन आणि स्वभाव त्याच्या शरीराच्या वेगवेगळ्या भागांचा आकार पाहून कळतो. प्रत्येक व्यक्तीच्या जिभेचा रंग, आकार इत्यादी वेगवेगळे असतात. हस्तरेषाशास्त्रात त्याबद्दल बरेच काही सांगितले गेले आहे. अशा परिस्थितीत, जाणून घेऊया कोणत्या प्रकारच्या जिभेची माणसे खूप आनंदी आणि श्रीमंत असतात.**

- भाग्यवान अन् खूप आनंदी : हस्तरेषाशास्त्रानुसार, ज्यांची जीभ नाकाला स्पर्श करते. अशा लोकांना खूप भाग्यवान मानले जाते. अशा जिभेच्या लोकांना नेहमीच नशिबाची साथ मिळते आणि त्यांना जीवनात काही मोठे यशदेखील मिळते. असे मानले जाते की अशा जिभेचे लोक खूप आनंदी असतात.
- ज्ञानी, बुद्धिमान आणि हुशार : ज्या व्यक्तीची जीभ लाल, पातळ आणि खूप मऊ असते तो खूप ज्ञानी असतो. त्यांना अभ्यासात खूप रस असतो आणि त्यांना सर्वत्र ज्ञान मिळवायला आवडते. त्याच वेळी, त्यांच्या बुद्धिमत्तेने आणि हुशारीने त्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात यश देखील मिळते. तसेच, ते सर्वात कठीण परिस्थितीतून खूप हुशारीने बाहेर पडतात. लाल आणि पातळ जीभ असलेले लोक खूप धार्मिकदेखील असतात आणि देवाचे खरे भक्त बनू शकतात.
- मुली भाग्यवान : हस्तरेषाशास्त्रानुसार, ज्या मुलींची जीभ मऊ, लाल आणि पातळ असते त्या खूप भाग्यवान असतात. तसेच, त्यांना जीवनातील प्रत्येक आनंद मिळतो. लग्नापूर्वी आणि नंतरचे त्यांचे जीवनही आनंदी आणि शांत राहते. करिअरमध्येही ते आपल्या मेहनतीने आणि नशिबाने चांगले स्थान मिळवतात आणि आनंदी जीवन जगतात.
- अशा मुलींना सर्वोत्तम जीवनसाथी : असे म्हटले जाते की ज्या मुलींची जीभ लाल रंगाची असते त्यांना सर्वोत्तम जीवनसाथी मिळतो आणि लग्नानंतर त्यांचे जीवन खूप आनंदी राहते. या मुलींना कधीही कशाचीही कमतरता भासत नाही आणि त्यांना पैशाच्या बाबतीतही कोणतीही कमतरता भासत नाही. दुसरीकडे, ज्या मुलींची जीभ जाड असते त्यांना त्यांच्या आयुष्यात काही समस्यांना तोंड द्यावे लागू शकते आणि हस्तरेषाशास्त्रानुसार त्यांना वेळेपूर्वी काही अडचणींना तोंड द्यावे लागू शकते.
- पूर्ण आनंद आणि समृद्धी : ज्यांची जीभ टोकदार असते आणि थोडी लांब असते, तर ती खूप भाग्यवान मानली जाते. हस्तरेषाशास्त्रानुसार, अशा लोकांना आयुष्यात खूप कमी दुःखांना तोंड द्यावे लागते. तसेच, त्यांना त्यांच्या आयुष्यात सर्व प्रकारचे सुख आणि विलासिता मिळते. ते त्यांच्या करिअरमध्ये मोठ्या उंचीवर पोहोचतात आणि भरपूर पैसे कमवतात. यामुळे, त्यांना पैशाच्या समस्या खूप कमी असतात.

# दातांवरून कळते भविष्य

**सामुद्रिक शास्त्र आणि हस्तरेषाशास्त्रात एखाद्या व्यक्तीचे भविष्य आणि स्वभाव त्याच्या शरीराच्या वेगवेगळ्या भागांची रचना पाहून कळते. यातील दातांच्या रचनेबद्दलही बरेच काही सांगितले गेले आहे...**



## असे दात असलेल्या लोकांना भाग्य मिळते

सामुद्रिक शास्त्रानुसार, बत्तीस दात असलेल्या लोकांचे जीवन खूप आनंददायी असते. हस्तरेषाशास्त्रात असे दात खूप शुभ मानले जातात. या लोकांना नेहमीच भाग्य मिळते आणि ते प्रत्येक क्षेत्रात यश मिळवतात. या लोकांना सत्याच्या मार्गावर चालणे आवडते आणि ते खोटे बोलणाऱ्यांपासून नेहमीच अंतर ठेवतात. नशिबामुळे त्यांना करिअरमध्ये चांगले यश देखील मिळते. ते कोणतेही काम हाती घेतात तेव्हा कठोर परिश्रमाने निश्चितच प्रगती करतात.

## पैशाचा अभाव या लोकांना देतो त्रास

हस्तरेषाशास्त्रात असे म्हटले जाते की ज्या लोकांना तीस दात असतात त्यांना आयुष्यात पैसे कमविण्यासाठी खूप संघर्ष करावा लागतो. करिअरमध्ये खूप मेहनत केल्यानंतरच ते काही प्रमाणात यश मिळवू शकतात. असे मानले जाते की असे लोक जीवनात पैशाच्या कमतरतेमुळे खूप चिंतित असतात आणि अनेकदा मानसिक ताणतणावाचा सामना करतात. पण जर या लोकांची वृत्ती कधीही हार न मानण्याची असेल आणि ते नेहमी कठोर परिश्रम करत राहिले तर काही काळानंतर ते निश्चितच प्रगती करतात. आयुष्यात पैशांच्या कमतरतेमुळे त्यांना काही समस्यांनाही तोंड द्यावे लागते.

## असे लोक खूप श्रीमंत

जर एखाद्या व्यक्तीचे दात सरळ रेषेत समान उंचावलेले असतील आणि गुळगुळीत देखील असतील तर ते खूप चांगले मानले जाते. सामुद्रिक शास्त्रानुसार, असे दात असलेले लोक खूप श्रीमंत असतात आणि या लोकांना कधीही पैशाची कमतरता भासत नाही. हे लोक त्यांच्या कारकिर्दीतही खूप प्रगती करतात आणि त्यांचे संपूर्ण आयुष्य आनंदाने घालवतात. सरळ रेषेत समान उंचावलेले दात दर्शवितात की असे लोक दिसायलाही खूप आकर्षक असतात आणि कोणताही निर्णय हुशारीने घेण्यास आवडतात.

## या लोकांना आर्थिक संकटाचा सामना

हस्तरेषाशास्त्रानुसार, ज्यांचे दात आतल्या बाजूला वाकलेले असतात त्यांना जीवनात अनेक समस्या आणि अडथळ्यांना तोंड द्यावे लागते. यामुळे त्यांची आर्थिक स्थिती देखील कमकुवत असते. या लोकांना जीवनात आनंद मिळविण्यासाठी खूप कष्ट करावे लागतात. याशिवाय, सामुद्रिक शास्त्रात खडबडीत आणि काळे दिसणारे दातदेखील शुभ मानले जात नाहीत. अशा दात असलेल्या लोकांना आयुष्यात खूप त्रास सहन करावा लागतो.


## दात लांब असतील तर खूप भाग्यवान

जर एखाद्या व्यक्तीचे दात लांब असतील तर तो खूप भाग्यवान मानला जातो. अशा लोकांना कधीही पैशाची कमतरता भासत नाही आणि हे लोक आयुष्यात खूप पैसे कमवतात. याशिवाय ज्यांचे दात एकमेकांपासून वेगळे असतात ते त्यांच्या जोडीदाराच्या पैशाने त्यांच्या सर्व इच्छा पूर्ण करतात आणि आनंदी जीवन जगतात. दुसरीकडे, ज्यांचे दात हळूहळू बाहेर येतात त्यांचे आयुष्य खूप लांब असते. परंतु ज्यांचे दात खूप लहान असतात त्यांना आयुष्यात खूप त्रास सहन करावा लागतो.

# अवयवदानात महाराष्ट्र देशात अव्वल

**मुंबई (प्रतिनिधी)–** अवयवदानाच्या बाबतीत महाराष्ट्र देशात आघाडीवर असून, गेल्या वर्षी राज्यात १९८ ब्रेन-डेड दात्यांची नोंदणी झाली आहे. यामुळे महाराष्ट्र तेलंगणा, तामिळनाडू आणि कर्नाटक यांसारख्या राज्यांच्या पुढे आहे. मुंबई, पुणे आणि नागपूर येथील 'झोनल ट्रान्सप्लांट कोऑर्डिनेशन सेंटर्स' ने 'ग्रीन कॉरिडॉर'चा वापर करून अवयवांची जलद वाहतूक करून आणि प्रत्यारोपण गतीमान करून या यशात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

एका उल्लेखनीय उदाहरणात, मुंबईतील एका १६ वर्षीय मुलाला फेब्रुवारी २०२५ मध्ये ब्रेन-डेड घोषित केल्यानंतर, त्याचे अवयव चार वेगवेगळ्या रुग्णांना प्रत्यारोपित करण्यात आले. मुंबईत मोठ्या संख्येने



लोक अवयव प्रत्यारोपणाच्या प्रतीक्षेत आहेत, ज्यात ४,००० लोकांना किडनी आणि २,००० लोकांना लिव्हरची गरज आहे.

विविध संस्थांमध्ये जनजागृती मोहिम सुरू असूनही, धार्मिक आणि सामाजिक अडथळे, विशेषतः ग्रामीण भागात, अजूनही एक आव्हान आहे, जिथे कुटुंबाची संमती मिळवणे कठीण होते. एका वृत्तपत्रानुसार, भारतातील अपघातांची मोठी संख्या पाहता, ब्रेन-डेड रुग्णांचे अवयव ओळखण्यासाठी आणि वापरण्यासाठी अधिक संघटित प्रणाली तयार केल्यास प्रत्यारोपणाची संख्या लक्षणीय वाढू शकते.

भारतात अवयवदानाचा दर खूप कमी आहे. २,६०,००० हून अधिक रुग्ण प्रतीक्षेत आहेत, परंतु आवश्यक असलेल्या अवयवांपैकी फक्त १०% उपलब्ध आहेत. या मोठ्या तफावतीमुळे अनेक रुग्णांना डायलिसिसवर अवलंबून राहावे लागते किंवा प्रत्यारोपणाची वाट पाहत असताना गंभीर आरोग्य समस्यांना तोंड द्यावे लागते.

२०१९ पासून, 'नॅशनल ऑर्गन डोनेशन अँड ट्रान्सप्लांटेशन प्रोग्राम'ने नोंदणी आणि प्रशिक्षणावर लक्ष केंद्रित केले आहे, परंतु 'प्रिज्युम्ड कन्सेंट' (झीर्शीशिव उेपीशपीं) प्रणाली, जी स्पेन आणि ऑस्ट्रियासारख्या देशांमध्ये यशस्वी झाली आहे, अजूनही भारतात लागू झालेली नाही. अशा प्रणालीमुळे कायद्यानुसार, एखाद्या व्यक्तीने पूर्वी विरोध केला नसल्यास, त्याचे अवयव वापरण्याची परवानगी मिळते. 'अवयवदान हे जीवनाचे वरदान आहे' ही संकल्पना अजूनही भारतात पूर्णपणे रुजलेली नाही, ज्यामुळे अनेक टाळता येण्याजोगे मृत्यू होत आहेत.

मागणी आणि पुरवठा यांच्यातील दरी खूप मोठी आहे. २ लाखांहून अधिक लोक किडनी प्रत्यारोपणाच्या प्रतीक्षेत आहेत आणि ५०,००० हून अधिक लिव्हर प्रत्यारोपणाच्या प्रतीक्षेत आहेत. भारताचा अवयवदानाचा दर प्रति दशलक्ष फक्त ०.५ आहे, तर स्पेनचा ४९.६ आणि अमेरिकेचा ३६.१ आहे. २०२४ मध्ये फक्त ७९० ब्रेन-डेड दात्यांसह, वाढीव जागरूकता आणि प्रणालीगत बदलाची गरज गंभीर आहे.

# लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या पुरुषांवर कारवाई, २६ लाख लोकांचा डेटा व्हेरिफाय

**मुंबई (प्रतिनिधी)–** विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर घाईघाईने राबवलेली महाराष्ट्र सरकारची महत्त्वकांक्षी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ' योजना सातत्याने चर्चेत राहिली. आधी सरसकट पात्र ठरवलेल्या महिलांना आता पडताळणी केल्यानंतर १४००० पुरुषांनीच या योजनेचा लाभ घेतल्याचा समोर आल्यानंतर आता पुढील १५ दिवसात लाडक्या बहिण योजनेचा लाभ घेणाऱ्या पुरुषांवर कारवाई करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत .

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार,महिला आणि बालकल्याण खात्याकडून सुमारे २६ लाख लाभार्थ्यांची माहिती महिला व बालकल्याण विभागाकडे पाठवण्यात आली आहे .त्यानुसार या खात्यांची सखोल पडताळणी सुरू असून अनेक प्रकरणांमध्ये लाभार्थी महिलांच्या नावावर लाभ मंजूर झाला असला तरी बँक खाते मात्र पुरुषाचा असल्याचा दिसून आला आहे .

या पार्श्वभूमीवर महिला व बालकल्याण विभागाने बोगस लाभार्थ्यांकडून ११ महिन्यांचा संपूर्ण लाभ रक्कम वसूल करण्याचा निर्णय घेतला आहे .या निर्णयानुसार प्रत्येक बोगस खात्याकडून १६५०० वसूल करण्यात येतील .इतकंच नव्हे तर याप्रकरणी गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया देखील सुरू करण्यात येणार आहे .मात्र ज्या महिलांनी त्यांच्या स्वतःच्या खात्याऐवजी इतर कुटुंबीयांचे खाते तात्पुरते जोडले आणि नंतर ते बदलले अशा लाभार्थींचा लाभ सुरू राहणार आहे .पण यात जर काही बोगस माहिती समोर आली त्यांच्याकडून ११ महिन्यांचे पूर्ण पैसे वसूल करण्यात येणार आहेत .

निवडणुकीच्या तोंडावर घाईघाईने राबवलेल्या महायुती सरकारच्या लाडकी बहिणी योजनेत सुरुवातीला सर्रास सरसकट महिलांना पात्र ठरवण्यात आलं . त्यांचा खात्यात थेट पैसेही जमा झाले .हे पैसे नक्की कोणाला मिळाले याची मोजतात खुद्द सरकारकडेही नव्हती .पात्र पात्र ठरवण्याचा सक्षम यंत्रणाही नसल्यामुळे या योजनेचा अनेकांनी गैरफायदा घेतला .विशेष म्हणजे पुरुषांनी महिलांच्या नावावर खोट्या कागदपत्रांच्या आधारे या योजनेचा लाभ घेतल्याचा समोर आलं .

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील तब्बल २६ लाख ३४ हजार लाडक्या बहिणी विविध कारणांनी अपात्र ठरल्याचं जाहीर करण्यात आलं .यावेळी काही ठिकाणी पुरुषांनी या योजनेसाठी अर्ज केल्याचं निदर्शनास आल्यानंतर राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे .लाडकी बहीण योजनेत तब्बल ४८०० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप खासदार सुप्रिया सुळे यांनी केला .हा सॉफ्टवेअर पासून झालेला घोटाळा असल्याचं त्यांचा आरोप होता .दरम्यान लाडक्या बहिणी योजनेचा लाभ घेणाऱ्या पुरुषांवर कारवाई करण्यासाठी हालचाली सुरू झाल्या आहेत

# लाल किल्ल्याच्या आत पोहोचला डमी बॉम्ब; ७ पोलीस निलंबित

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** देशाची राजधानी दिल्लीत येत्या १५ ऑगस्टच्या स्वातंत्र्यदिनाच्या अनुषंगाने कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. तर सुरक्षेच्या दृष्टीने राजधानीत कडक सुरक्षा यंत्रणा डोळ्यात तेल घालून पाहारा देत आहे. दरम्यान, स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वीच लाल किल्ल्याच्या सुरक्षेसंदर्भात एक धक्कादायक घटना समोर आली असून त्यात मोठी चूक झाल्याचे आढळून आले आहे. स्वातंत्र्यदिनापूर्वी दिल्ली पोलिसांचा विशेष सेल मॉक ड्रिल दरम्यान लाल किल्ल्याच्या आत डमी बॉम्ब घेऊन पोहोचलाय. परिणामी सुरक्षेतील त्रुटींमुळे ड्युटीवर तैनात असलेल्या सात पोलिसांना तात्काळ निलंबित करण्यात आले आहे.

पुढे आलेल्या माहितीनुसार, डीसीपी राजा बांठिया यांनी सुरक्षा सुधारण्याचे आदेश दिले होते. अशातच १५ ऑगस्टपूर्वी सुरक्षा व्यवस्था तपासण्यासाठी एक मॉक ड्रिल घेण्यात आली होती. या काळात पोलीस डमी बॉम्ब घेऊन लाल किल्ल्यावर पोहोचले. पंतप्रधानांच्या स्वातंत्र्यदिनाच्या भाषणामुळे लाल किल्ला दहशतवाद्यांच्या निशाण्यावर आहे, त्यामुळे सुरक्षेतील त्रुटी ही गंभीर बाब आहे. परिणामी सुरक्षेतील त्रुटींमुळे ड्युटीवर तैनात असलेल्या सात पोलिसांना तात्काळ निलंबित करण्यात आले आहे. सध्या निलंबित पोलिसांविरुद्धही चौकशी सुरू करण्यात आली आहे.

एक महत्त्वाची गोष्ट पाच बांगलादेशी नागरिक लाल किल्ल्यात बेकायदेशीरपणे प्रवेश करण्याचा प्रयत्न करताना पकडले गेले. त्यांच्याकडून बनावट आधार कार्ड जप्त करण्यात आले आहेत. पोलिसांनी बांगलादेशी नागरिकांना डिटेंशन सेंटरमध्ये पाठवले आहे. आता १५ ऑगस्टच्या पार्श्वभूमीवर लाल किल्ल्यावरील सुरक्षा व्यवस्था आणखी वाढवण्यात आली आहे.

सुरक्षेच्या कारणास्तव दिल्ली पोलिसांनी १६ ऑगस्टपर्यंत राजधानीत पॅराग्लायडर, हँग-ग्लायडर आणि हॉट एअर बलून सारख्या उप-पारंपारिक हवाई प्लॅटफॉर्मच्या उड्डाणांवर बंदी घातली आहे. स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमापूर्वी, दिल्ली पोलिसांनी याबाबत एक आदेश देखील जारी केला आहे. आदेशात असे म्हटले आहे की पॅरा-मोटर्स, हँग-ग्लायडर, यूएव्ही, यूएएस, मायक्रोलाईट विमाने, रिमोट-कंट्रोल्ड विमाने १६ ऑगस्टपर्यंत बंदी राहतील. आदेशात सुरक्षेची कारणे नमूद करण्यात आली आहेत.

## २ वर्षांपासून वीजचोरी, रिमोट कंट्रोलने ७७,१७० युनिट चोरले; १९ लाखांचा दंड

**पुणे (प्रतिनिधी)–** महावितरणच्या वीजचोरीच्या घटना सातत्याने घडतात, अनेकदा शेतकऱ्यांवर वीजचोरीचा आरोप केला जातो. मात्र, उद्योगविश्वासतही सरकारी वीजेचा सातत्याने चोरी होत असते. पुण्यातील भोसरी एमआयडीसीमध्ये अशीच वीजचोरीची घटना उघडकीस आली आहे. विशेष म्हणजे गेल्या २ वर्षांपासून ही चोरी करतण्यात येत होती, अखेर या कंपनीच्या मालकाकडून तब्बल १९ लाख १९ हजारांचा दंडही वसुल केला आहे. एका औद्योगिक (चखऊ) ग्राहकाकडून रिमोटचा वापर करुन केली जाणारी वीजचोरी महावितरणने नुकतीच उघडकीस आणली असून, या ग्राहकाकडून महावितरणने १९ लाख १९ हजारांचा दंड वसूल केला आहे. तसेच वीजचोरीसाठी वापरले जाणारे साहित्य जप्त केले आहे.

महावितरणचे अध्यक्ष तथा लोकेश चंद्र यांनी वीज वितरण हानी कमी करण्याबाबत क्षेत्रिय अधिकाऱ्यांना निर्देश दिले होते. त्यानुसार महावितरण पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता सुनिल काकडे यांनी वीजचोरी विरोधात मोहीम तीव्र करण्याच्या सूचना दिल्या. गणेशखिंड मंडलाचे अधीक्षक अभियंता सिंहाजीराव गायकवाड व भोसरी विभागाचे कार्यकारी अभियंता अतुल देवकर यांनी खास पथक तयार केले. अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांच्या नेतृत्वाखाली सहा. अभियंता गजानन झापे, वीज कर्मचारी हर्षद लोखंडे, सोमनाथ गायकवाड, महेश वाघमारे यांनी भोसरी एमआयडीसीमध्ये तपासणी सुरु केली. तेंव्हा मे. गणेश प्रेसिंग या औद्योगिक ग्राहकाकडून रिमोटद्वारे वीजचोरी केली जात असल्याचे आढळले. वीजचोरीसाठी वापरलेले सर्व साहित्य महावितरणने जप्त केले आहे. तसेच या ग्राहकाला मागील दोन वर्षांमध्ये केलेल्या ७७,१७० युनीटच्या वीजचोरी पोटी १९ लाख १९ हजार ३६२ रुपयांचा दंड व २ लाख ३० हजारांचे तडजोड आकाराचे देयक देत दंड वसूल करण्यात आला आहे. महावितरणच्या या कारवाईमुळे वीजचोरांचे धाबे दणाणले आहेत.

# लातूर जिल्ह्यात वृक्ष लागवडीसाठी दोन दिवसीय विशेष मोहीम

**लातुर(प्रतिनिधी)–** जिल्ह्यात वृक्ष लागवडीला गती देण्यासाठी दोन दिवसीय विशेष मोहीम राबविली जाणार आहे. यानुसार, १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिनी जिल्ह्यात व्यापक स्वरूपात वृक्षारोपणासाठी 'मेगा ड्राईव्ह' आयोजित केला जाईल. तसेच, गतवर्षीप्रमाणे यंदाही १७ ऑगस्ट रोजी गंजगोलाई परिसरात आणि प्रत्येक तालुक्यामध्ये 'माझं लातूर, हरित लातूर' अंतर्गत 'लातूर हरितोत्सव' साजरा होईल. या दोन्ही उपक्रमांमध्ये नागरिक, पर्यावरणप्रेमी संघटना आणि स्वयंसेवी संस्थांनी सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले आहे. जिल्ह्यात १५ ऑगस्ट रोजी वृक्षारोपण मेगा ड्राईव्ह स्वातंत्र्यदिनी राबविल्या जाणाऱ्या वृक्षारोपण मोहिमेत सर्व प्रशासकीय विभागांचे तालुका, जिल्हा आणि ग्रामस्तरीय कार्यालये सहभागी होतील. शासकीय इमारतींचा परिसर, रस्त्यांच्या दुतर्फा आणि शासकीय जागांवर मोठ्या प्रमाणात वृक्षारोपणाचे नियोजन आहे. यासाठी सामाजिक वनीकरण आणि वन विभागाच्या रोपवाटिकांमधून रोपे उपलब्ध करून दिली जातील. सर्व जिल्हास्तरीय विभागप्रमुखांनी याबाबत आढावा घेण्याच्या सूचना जिल्हाधिकारी ठाकूर-घुगे यांनी दिल्या आहेत. तसेच, या उपक्रमात जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी सहभागी होऊन आपल्या घराच्या अंगणात आणि परिसरात वृक्षारोपण करावे, तसेच वृक्षप्रेमी संघटना आणि संस्थांनी व्यापक प्रमाणात वृक्ष लागवड करावी, असे आवाहन त्यांनी केले आहे.


## टी.सी.हरवली

माझी कुं.प्रज्ञा शेषेराव कांबळे या नावाची १२ वी विज्ञान पास टि.सी.अशोक नगर कोट बाजार कंधार येथुन ऑटोने प्रवास करताना हरवली आहे, सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**–संपर्क पत्ता–**
**प्रज्ञा शेषेराव कांबळे अशोक नगर कोट बाजार, कंधार**


## Change In Name

My old name is ABDUL KHAJAMIYA MAHBUBSAHAB SHAIKH which now I am changing as new name: ABDULKHAJA MAHBUB SHAIKH Hence forth my all correspondence will be done as per my new name please consider the same Add: NARSINH MANDIR PARISAR JUNE GAON NARSI TQ NAIGAON (KHAI) DIST NANDED MAHARASHTRA 431709 MO.9960375131

## Change In Name

My old name is LONDE MADHAV RAMESHRAO which now I am changing as new name: LONDHE MADHAV RAMESHRAO Hence forth my all correspondence will be done as per my new name please consider the same Add: H.N.75 ANANDSAGAR SOCIETY CIDCO NANDED 431603 MO.9518315321



महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर जि.नांदेड
ई-निविदा सुचना क्र.०८ सन २०२५-२६

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर जि.नांदेड (दुरध्वनी क्रमांक ०२४६७-२२२६५८) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून नांदेड जिल्ह्यातील एकूण २१ कामांकरीता बी-१ नमुन्यातील ई-निविदा (ऑनलाईन) प्रणालीद्वारे मागविण्यात येत आहे.

टीप- १) निविदा कागदपत्राचा तपशिल महाराष्ट्र शासनाच्या ई-टेंडरींग संकेतस्थळ https://mahatenders.gov.in/ आणि www.mahapwd.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.
२) सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.
३) निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर जि.नांदेड यांना राखुन ठेवला आहे.

कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग भोकर
जि.नांदेड

## जाहीर प्रगटन

हिमायतनगर येथील दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात हिमायतनगर, जि. नांदेड,इतर किरकोळ दिवाणी (आर.जे.ई) अर्ज क्रमांक:- ५३ / २०२५. विमल विरुद्ध निरंक पु. ता:१०८/२०२५.

अर्जदार-विमल भ्र. विजय कोठेकर, वय- ५७ वर्ष, व्यवसाय- घरकाम, रा. सिरंजनी, ता. हिमायतनगर, जि. नांदेड.

विरुद्ध गैरअर्जदार- निरंक.

मुंबई विनियम कायदा ( Bombay Regulation Act) सन १८२७ नुसार मयत विजय पि. ईरण कोठेकर च्या मृत्यू पश्यात अर्जदाराला कायदेशीर वारसदार ठरवून उत्तराधिकारी / वारसा प्रमाणपत्र (Legal Heirs Certificate) मिळणेबाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात अर्ज सादर केला असून त्यात असे कथन आहे की, विजय पि. ईरण कोठेकर चा मृत्यु दिनांक २८.११.२०१६ रोजी रा. सिरंजनी, ता. हिमायतनगर, जि. नांदेड येथे झाला. मयत विजय पि. ईरण कोठेकर हा मुळचा सिरंजनी, ता. हिमायतनगर. जि. नांदेड येथील रहिवासी होता... मयताच्या पश्यात अर्जदार हा वरील ठिकाणची राहणारा असून कायदेशीर वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदाराने या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणाशी आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरुपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ मार्फत ३० दिवसाच्या आत या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही आक्षेप / उजर नाही असे समजून प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमित करण्यात येतील. आज दिनांक ४/०७/२०१५ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

**आदेशावरून**
**क.लिपीक** **सहा अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क.स्तर हिमायतनगर**

## जाहीर प्रगटन

मौजे असदुल्लाबाद ता.जि. नांदेड मनपा हद्दीतील शेत सर्व्हे नंबर ४२/ बी व २९/७ सिटी सर्व्हे नंबर १०३२ पैकी वसंतनगर मधील प्लॉट नंबर ८४ व त्यावरील आर्शिवाद अपार्टमेंटमधील तिसऱ्या मजल्यावरील रहीवाशी उपयोगाची सदनिका क्र.१४ असून क्षेत्र.८१५ चौरस फुट म्हणजेच ७५.७४ चौ.मी. आहे. सदर सदनिका कविता हरिश्चंद्र प्रेमचंदाणी व सौ.लक्ष्मी दिपक प्रेमचंदानी रा.सिंधी कॉलनी नांदेड यांचेकडून रामदास प्रभाकर आगलावे रा.चिलका ता.अहमदपुर जि.लातूर यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

**प्लॉटनंबर ३४ ची** चुर्तसिमा पुर्वेस-सदनिका क्र.१३, पश्चिमेस- ३ फुट रूंद रोड कॉम्प्लेक्सची जागा व राजेगोरे यांचे घर, दक्षिणेस-३ फुट रूंद रोड कॉम्प्लेक्सची जागा व उमरेकर यांचे घर,उत्तरेस - २५ फुट रूंद रोड,**प्लॉटनंबर ३३ ची चुर्तसिमा** पुर्वेस-प्लॉट नंबर ४३, पश्चिमेस- २०फुट रूंद रोड, दक्षिणेस-२५ फुट रूंद रोड,उत्तरेस - सदनिका क्र.११

तरी वरील प्लॉट बद्दल कोणाचा काही हक्क, उजर, दावा आक्षेप सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर/ आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या उजर आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही व नंतर प्लॉट खरेदी खत करण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन

**जाहीर प्रगटन देणार**
**रामदास प्रभाकर आगलावे**
**रा.चिलका ता.अहमदपुर जि.लातूर मो.९५६१८७२३००**

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील ३ रे सह दिवाणी न्यायाधीश व स्तर, नांदेड यांच्या न्यायालयात (समक्ष श्री. एस. एम. बोराळे) किरकोळ दिवाणी अर्ज (आरजेई) क. ११६२/२०२५

अर्जदार :-१.नितीन पि. मुरलीधरराव जळकोटे,वय ५२ वर्षे, व्यवसाय व्यापार,रा. एन. डी. ४, सिडको, नवीन नांदेड, ता. जि. नांदेड.२.संगीत भ्र. उमाकांत पदमावार, वय ५० वर्षे, व्यवसाय घरकाम,रा. कोकलेगाव ता. नायगाव खै. जि. नांदेड.३.स्वाती पि. मुरलीधरराव जळकोटे,वय ४८ वर्षे, व्यवसाय -घरकाम, रा. शाम नगर नांदेड, ता. जि. नांदेड ४.योगेश पि. मुरलीधरराव जळकोटे,वय ४६ वर्षे, व्यवसाय व्यापार, रा. एन. डी. ४, सिडको, नवीन नांदेड, ता. जि. नांदेड.

विरूध्द

गैरअर्जदार :-१. प्रशासक, सिडको कार्यालय, नांदेड २. नांदेड वाघाळा महानगरपालीका. मार्फत कमिशनर, शिवाजी पुतळा जवळ, प्रकरण :- भारतीय उत्तराधिकार कायदा कलम २७८ अन्वये मयताचे

मिळकतीचे प्रशासकीय प्रमाणपत्र अर्जदाराच्या नांवे मंजुर होणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात मयत मुरलिधर पि. मारोतराव जळकोटे यांच्या मिळकतीचे प्रशासकीय प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. अर्जदार क्र. १ आणि ४ ही मयत मुरलिधर पि. मारोतराव जळकोटे यांची मुले आहेत. अर्जदार क. २ व ३ या मयत मुरलिधर पि. मारोतराव जळकोटे यांच्या मुली आहेत. मयत मुरलिधर पि. मारोतराव जळकोटे हे दिनांक २२/११/२०१६ रोजी व मयताची पत्नी व अर्जदार क्र. १ ते ४ यांची आई यांचा मृत्यू १६/१०/२०२४ रोजी त्यांच्या राहत्या घरी झाला आहे. मयत मुरलिधर पि. मारोतराव डी जळकोटे यांची मालमत्ता एन.डी. ४५ डब्ल्यू सिडको, नविन नांदेड, प्लॉट क्र. १०४, गोकुळ कॉम्प्लेक्स, मेन रोड सिडको, नविन नांदेड दुकान क्र. ३५ गोकुळ कॉम्प्लेक्स, मेन रोड सिडको नविन नांदेड च्या संबंधी प्रशासकीय प्रमाणपत्र अर्जदाराच्या नांवे मिळणेसाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

प्रस्तुत प्रकरणी वर नमुद मिळकतीचे प्रशासकीय प्रमाणपत्र अर्जदाराच्या नांवे देण्यास कोणांस काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वत: हजर राहून या न्यायालयात दिनांक ३०/०८/२०२५ रोजी किंवा तत्पुर्वी नोंदवावा. मुदतीनंतर येणा-या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.आज दिनांक ०५ माहे ऑगस्ट, २०२५ माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कीने दिला

आदेशावरून
कनिष्ठ लिपिक, स.अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर, नांदेड.

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील ७ वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, नदिड यांच्या न्यायालयात (समक्ष श्री ए. जी. चव्हाण).किरकोळ दिवाणी अर्ज क. १२२६/२०२५ सुजाता व इतर वि. निल

अर्जदार : (१) सुजाता शेखर मुदीराज २) ओंकार शेखर मुदीराज अ.पा. क अर्जदार क्र १ (३) आरती शेखर मुदिराज अ.पा. क अर्जदार कर १ ४) सुशीलाबाई सत्यनारायण मुदिराज सर्व रा. गोकुळनगर, नांदेड ता.जि.नांदेड

विरूद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारसा प्रमाणपत्र मिळण्याचा अर्ज

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. वरील अर्जदार मयत शेखर सत्यनारायण मुदीराज यांचे वारस आहेत. मयत शेखर सत्यनारायण मुदीराज यांचा दिनांक १९/०९/२०२१ मृत्यु झाला. अर्जदारांनी अर्जात नमुद केले आहे की, अर्जदार क. १ हि पत्नी, अर्जदार क. २ मुलगा, अर्जदार के. ३ मुलगी, अर्जदार क्र. ४ हि मयताची आई आहे. वर नमुद अर्जदाराशिवाय ईतर कोणीही मयताचे कायदेशिर वारसदार नसल्याचे अर्जदाराने अर्जात कथन केले

तरी, प्रस्तुत प्रकरणी अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणांस काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः हजर राहून या न्यायालयात दिनांक ०४/०९/२०२५ रोजी किंवा एक महिन्याच्या आत नोंदवावा. मुदतीनंतर येणा-या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.आज दिनांक ०२.०८.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयाने दिला.

आदेशावरून
कनिष्ठ लिपिक, स.अधिक्षक
७ वे सह दि.न्या.क.स्तर नांदेड दि.न्या.व.स्तर नांदेड

## जाहीर समन्स

नांदेड येथील ७ वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, नांदेड यांच्या न्यायालयात (समक्ष श्री ए. जी. चव्हाण).
नियमित दिवाणी दावा ५७/२०१६ संग्राम वि. केशव
प्रति,
प्रतिवादी
१. हरीभाउ विठ्ठलराव धम्पलवार वय : ६१, व्यवसाय : व्यापार
रा. वस्तू व सेवा भवन आंबेडकर पूतळ्याच्या मागे, नांदेड.
दावा : मालकी घोषित करणेबाबत.

ज्या अर्थी वरील प्रकरणामध्ये आपणास वेळोवेळी समन्स पाठविण्यात आले होते, परंतु असे दिसून येत आहे की, नमुद पत्यावर समन्स पाठविले असता आपण जाणून-बुजुन टाळाटाळ करीत आहात असे वादीचे म्हणणे आहे.

प्रतिवादी नामे हरीभाउ विठ्ठलराव धम्पलवार यांना या जाहीरसमन्सव्दारे कळविण्यात येते की, आपण दिनांकः- ०९/०९/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता स्वतः अथवा आपल्या वकीला मार्फत लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. अन्यथा आपणास आक्षेप नाही असे समजून योग्य तो निर्णय दिला जाईल याची संबंधीतानी नोंद घ्यावी.

आज दिनांक ०६.०८.२०२५ रोजी माझ्या सहीनिषी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून
कनिष्ठ लिपिक, स.अधिक्षक
७ वे सह दि.न्या.क.स्तर नांदेड दि.न्या.व.स्तर नांदेड

## जाहीर प्रगटन

संचिका क्रमांक. ४४/४०/२०२५- २०२६/
क्षे.का.क्र.१ तरोडा सांगवी

प्रकरण :- नांव परिवर्तन करणे बाबत.

जाहिर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,श्री सौ.छाया सुधाकर कांबळे व इतर रा.तरोडा बु नांदेड यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, तानिभूअ पत्र क्र.४६६८/२०२२ दिनांक ३०/८/२०२२ तरोडा खु.गट नंबर १२७ प्लॉट क्रमांक ८/ए पिन नंबर ४०६०१०३४८२ श्री सुधाकर बालाजीराव कांबळे यांचे नावे नोंद असलेली मालमत्ता यांचेकडून अर्ज वारसा प्रमाणपत्र क्रमांक २९७/२०२२ दिनांक १८/८/२०२२ च्या अधारे विकत घेतली आहे./वारसा हक्क प्राप्त झाली आहे.

तरी त्यांचे नावाची नोंद नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या मालमत्ता कर आकारणी नोंदवहीत घेण्यात येत आहे. तरी या सबंधात कोणी काही आक्षेप असल्यास त्यांना हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेल्या तारखेच्या १५ दिवसांच्याआत कार्यालयात आपला लेखी आक्षेप पुराव्यासह दाखल करावा.अन्यथा वरील अवधी संपल्यानंतर सदरील मालमत्तेवर अर्जदाराचे नावाने मालमत्ता कर आकारणी नोंदवहीत सदरील नावाची नोंद घेण्यात येईल.**चर्तुसिमा-पुर्वेस-सोनल वर्मा यांची जागा,पश्चिमस-२०.०० फुट रूंद रस्ता दक्षिणेस-श्रीराम गोजाळ व भगवान दासराव यांचा प्लॉट आहे,उत्तरेस-प्लॉट नंबर ९ आहे**

**क्षेत्रिय अधिकारी**
**क्षेत्रिय कार्यालय क्र.१ तरोडा सांगवी**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका**

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट,पहिला मजला,
शिवाजी नगर,नांदेड

# गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# लोहा व कंधार येथे मागासवर्गीय मुला व मुलींसाठी शासकीय वसतिगृहास मंजुरी

## आ. चिखलीकर यांच्या पाठपुराव्याला यश

**नांदेड (प्रतिनिधी)**– लोहा व कंधार तालुक्यातील मागासवर्गीय मुला-मुलींच्या शासकीय वसतिगृहास मंजुरी मिळाली आहे. या वसतिगृहाच्या मंजुरीसाठी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी प्रयत्न केले. त्यांच्या या प्रयत्नाला अखेर यश आले आहे.

लोहा व कंधार तालुक्यातील मागासवर्गीय मुला-मुलींच्या वसतिगृहास मंजुरी मिळाली आहे. या वसतिगृहामुळे इयता पाचवी ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची शिक्षण तसेच निवास व भोजनाची सोय होणार आहे. सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी शासकीय वसतिगृह मंजुरीचे पत्र पाठविले आहे.

लोहा व कंधार तालुक्यातील मागासवर्गीय मुला-मुलींच्या इयता पाचवी ते बारावीपर्यंत तालुक्याच्या ठिकाणी शिक्षणासाठी राहण्याची व भोजनाची सोय व्हावी यासाठी शासकीय वसतिगृह मंजुरीसाठी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी शासनदरबारी पाठपुरावा केला.

लोहा येथे पत्रकारांशी अनौपचारिक चर्चा करताना आ. चिखलीकर यांनी वसतिगृह मंजुरीबाबतचे पत्र दाखविले. तसेच त्या पत्राचे जाहीर वाचन करण्यात आले. माजी नगराध्यक्ष कल्याणराव सूर्यवंशी, माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, छत्रपती धुतमल, दता वाले, करीम शेख, सेवानिवृत्त डीवायएसपी सोपानराव मोरे, राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष मनोहर पाटील भोसीकर, भास्कर पवार, पंचशील कांबळे, बालाजी खिल्लारे, अप्पाराव पवार, बी. डी. जाधव, अभंग पाटील, माधव पाटील बोरगावकर, राम पाटील, दीपक पाटील कानवटे यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होते.

सामाजिक न्यायमंत्री यांनी पत्राद्वारे आपल्या तालुक्यातील ग्रामीण भागातून शिक्षणासाठी येणाऱ्या मागासवर्गीय मुला-मुलींना कंधार व लोहा येथे नवीन शासकीय वसतिगृह स्थापनेची मागणी केली होती. सदर मागणीचे मागील उद्दिष्ट अत्यंत महत्त्वाचे आहे. आपल्या तालुक्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीय असून, त्यांना शिक्षणासाठी तालुक्याच्या ठिकाणी सोय व्हावी, निवास व भोजनाच्या सुविधांअभावी अनेक विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहतात, अशा परिस्थितीत शासकीय वसतिगृह उपलब्ध झाल्यास त्यांना सुरक्षित निवास, पोषणयुक्त भोजन, अभ्यासासाठी अनुकूल वातावरण आणि शैक्षणिक साहित्य यांची सुविधा मिळू शकते. कंधार व लोहा येथे नवीन शासकीय वसतिगृहास मंजुरी देण्यात येत आहे अशा आशयाचे पत्र आ. चिखलीकर यांना प्राप्त झाले आहे.

# नांदेडमध्ये आजपासून नऊ दिवस चालणार गोर बंजारा तीज महोत्सव –डॉ. निकिता चव्हाण

**नांदेड (प्रतिनिधी)**– येथे मागील २० वर्षांपासून गोरबंजारा तीज महोत्सव साजरा करण्यात येतो. या महोत्सवात बंजारा समाजाची रुढी-परंपरा, वेशभूषा, नृत्य, गाणे व संस्कृतीचे जतन केले जाते. सातत्याने २० वर्षे कोणताही महोत्सव साजरा करणे कठीण जरी असले तरी नांदेड शहरातील तीज महोत्सव समिती, मोठ्या उत्साहात ९ दिवसांचा सोहळा आनंदाने साजरा करत असतात. या वर्षी दि. ८ ऑगस्टपासून १६ ऑगस्टपर्यंत हा सोहळा चालणार आहे.




या महोत्सवात पारंपरिक नृत्य, खुल्या स्पर्धा, आनंदनगरी, ज्येष्ठ नागरिक व सेवानिवृत्त अधिकाऱ्यांचा सत्कार होणार असल्याचे समितीच्या अध्यक्षा डॉ. निकिता चव्हाण आणि डॉ. बी. डी. चव्हाण यांनी कळविले आहे.

शुक्रवार, दि. १५ ऑगस्ट रोजी ढबोळी पूजा व पिडीया खोसेरो (मुला-मुलींचे) कार्यक्रम पार पडल्यानंतर गोकुळ आष्ठमी पूजेचे आयोजन करण्यात आले आहे. ईशान चव्हाण यांचे गीतांजली कार्यक्रम मंगळवार, दि. १२ ऑगस्ट रोजी होणार आहे व दि. १६ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता महाप्रसाद व भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. तरी ९ दिवस चालणाऱ्या या महोत्सवात लोकमान्य मंगल कार्यालय नांदेड येथे उपस्थित राहण्याचे आवाहन तीज उत्सव समितीच्यावतीने अध्यक्षा डॉ. निकीता चव्हाण, सचिव माला पवार, कोषाध्यक्षा सीमा राठोड, श्रध्दा चव्हाण, देवका राठोड, वर्षा चव्हाण, डॉ. माया पवार, सुनिता पवार, सविता चव्हाण, गीता राठोड, लक्ष्मी राठोड, सुनिता आडे, वंदना जाधव, नंदा राठोड, अरुणा राठोड, सुनिता चव्हाण, अनिता राठोड, डॉ. शिल्पा चव्हाण, ललिता राठोड, मनोरमा राठोड, पूजा राठोड, शोभा चव्हाण, सोनम चव्हाण यांनी केले आहे.

# अभाविप नांदेड महानगरची नवीन कार्यकारिणी जाहीर

**नांदेड (प्रतिनिधी)**– अखिल भारतीय विद्यार्थी परिषद नांदेड महानगरच्यावतीने आयोजित छात्र शक्ती हुंकार विद्यार्थी संमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. या संमेलनात शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी नांदेड महानगर कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली.

या कार्यकारिणीत प्रा. डॉ. संजय पेकमवार यांची नांदेड महानगराध्यक्ष तर ऋषिकेश काळे यांची महानगर मंत्री म्हणून निवड करण्यात आली.

या कार्यक्रमास अभाविप देवगिरी प्रांताचे सहमंत्री डॉ. वरुणराज नन्नवरे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना संबोधित करत परिषदेमार्फत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी घेतल्या जाणाऱ्या उपक्रमांवर प्रकाश टाकला.

या संमेलनात विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी, कार्यकर्ते, पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. संमेलनात विद्यार्थी प्रश्न, शैक्षणिक धोरणे आणि नव्या योजनांवर चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत यशस्वी ठरले असून, अभाविप नांदेड महानगरची नवी कार्यकारिणी आगामी काळात विद्यार्थ्यांच्या हितासाठी सक्रिय भूमिका बजावेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अनेकांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# रविवारी वाचकपीठचा वाचकमेळा; अध्यक्षपदी प्राचार्य ठाले पाटील तर उद्घाटक भु. द. वाडीकर




**नांदेड (प्रतिनिधी)**– मराठवाडा साहित्य परिषद शाखा नांदेड आणि वाचकपीठ प्रतिष्ठान अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने होणाऱ्या वाचकमेळ्यात रविवार, दि. १० ऑगस्ट रोजी नांदेड येथे महाराष्ट्रातल्या मान्यवर साहित्यिकांची मांदियाळी जमणार आहे. तीन सत्रात होणाऱ्या या कार्यक्रमात उद्घाटन, कवितेचे चर्चासत्र आणि निमंत्रितांचे कविसंमेलन आयोजित केले आहे.

वाचकपीठ ही केवळ कवितेला वाहिलेली संस्था असून, नवोदितांमध्ये काव्य जाणिवा समृद्ध करण्याचे काम ही संस्था करते. नांदेडच्या शिवाजीनगर परिसरातील हॉटेल विसावा पॅलेस येथे हा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून ज्येष्ठ समीक्षक प्रा. भू. द. वाडीकर हे राहणार असून, कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील हे राहणार आहेत.

उद्घाटन सोहळ्यात राजारामबापू पाटील, ललित कला अकादमी महाराष्ट्र राज्याचे निमंत्रक प्रदीप पाटील, साहित्य परिषद शाखा नांदेडचे अध्यक्ष बालाजी इबितदार, वाचकपीठचे अध्यक्ष प्राचार्य चंद्रकांत भोसले, पत्रकार संजीव कुलकर्णी, साहित्यिक देवीदास फुलारी यांची यावेळी उपस्थिती राहणार आहे.

शेवटच्या सत्रात डॉ. वृषाली किन्हाळकर यांच्या अध्यक्षतेखाली कविसंमेलन होणार आहे. मधल्या सत्रात डॉ. प्रज्ञा दया पवार यांच्या हिल्लोळ हरवून आत बाहेरचा या कवितासंग्रहावर चर्चासत्र आयोजित केले असून, या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रा. ललिता गादगे ह्या उपस्थित राहणार आहेत. भाष्यकार म्हणून डॉ. पी विठ्ठल, दा. गो. काळे, डॉ. योगिनी सातारकर पांडे आणि दादा ननवरे हे उपस्थित राहणार आहेत. या सबंध कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन संयोजकाच्या वतीने भास्कर निर्मळ पाटील आणि महेश मोरे यांनी केले आहे.

# तहसीलदार संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी नागमवाड तर सचिवपदी दिवाकर यांची निवड

**नांदेड (प्रतिनिधी)**– महाराष्ट्र राज्य तहसीलदार व नायब तहसीलदार संघटनेच्या नांदेड जिल्हा अध्यक्षपदी नायब तहसीलदार संजय नागमवाड यांची तर सचिवपदी मकरंद दिवाकर यांची निवड करण्यात आली आहे.




३ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र राज्य तहसीलदार व नायब तहसीलदार संघटनेचे मुख्य सल्लागार निवासी उपजिल्हाधिकारी किरण आंबेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हा शाखेची बैठक घेण्यात आली. या बैठकीत निवृत्त नायब तहसीलदार व पदोन्नत नायब तहसीलदार यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. त्यानंतर संघटनेचे विभागीय सचिव मुगाजी काकडे यांच्या अध्यक्षतेखाली नांदेड जिल्हा शाखेची नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

या निवडीत तहसीलदार संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी संजय नागमवाड, उपाध्यक्ष रामेश्वर गोरे, नयना कुलकर्णी, सचिव मकरंद दिवाकर, कार्याध्यक्ष संजय वारकड, संघटक नंदकुमार भोसीकर, मंजुषा भगत, कोषाध्यक्ष सुनील माचेवाड, सहसचिव सतीश जोहरे, हयुम पठाण, सल्लागार विठ्ठल परळीकर, निमंत्रित सदस्य नायब तहसीलदार स्वप्नील दिगलवार यांच्यासह आदींची बिनविरोध निवड करण्यात आली. या निवडीबद्दल महसूल कर्मचारी संघटनेच्यावतीने सर्वांचे स्वागत करण्यात येत आहे.

# नांदेडमध्ये २४ ऑगस्ट रोजी होणार दिव्यांगांना कृत्रिम हात, पाय वाटप

**नांदेड (प्रतिनिधी)** – जिल्ह्यातील हात व पायाने अपंगत्व आलेल्या गरजू लाभार्थ्यांसाठी साधू वासवानी मिशन पुणे, प्रेमकुमार फेरवानी मित्र मंडळ, भाजपा व्यापारी आघाडी महानगर आणि लॉयन्स क्लब नांदेड एंजल्सच्या संयुक्त विद्यमाने २४ ऑगस्ट रोजी कृत्रिम हात-पाय (जयपूर फूट) मोफत शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या संधीचा गरजूंनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक प्रेमकुमार फेरवानी यांनी केले आहे.

नांदेड जिल्ह्यात मागील काही वर्षापासून प्रेमकुमार फेरवानी मित्र मंडळ कृत्रिम हात-पाय वाटपाचे मोफत शिबीर घेत असते. या शिबिराचा जिल्ह्यातीलच नव्हे तर बाहेर जिल्ह्यातीलही लाभार्थ्यांना यापूर्वी मोठा लाभ झाला आहे. यावर्षीही या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. २४ ऑगस्ट रोजी शहराच्या वजिराबाद भागातील गुजराती हायस्कूल येथे सकाळी नऊ ते दुपारी दोन वाजेपर्यंत हे शिबीर घेण्यात येणार आहे. या शिबिरामध्ये हात व पाय अपंगत्व आलेल्या गरजू दिव्यांगांनी २१ ऑगस्टपर्यंत शिबिरात माप देण्यासाठी नावनोंदणी करावी, असे आवाहन प्रेमकुमार फेरवाणी मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

या अवयवाचे वैशिष्ट्ये असे की, कृत्रिम अवयवांच्या सहाय्याने दैनंदिन जीवनातील सर्व कामे करण्यास सुलभता येते. अपघात, मधुमेह, रक्तवाहिन्यांचे आजार (गँग्रीन) व इतर कारणांमुळे पाय काढलेल्या रुग्णांना नवीन जीवन मिळते आणि हे कृत्रिम अवयव वापरण्यात अत्यंत सोपे आहे. अगदी पूर्वीप्रमाणे चालण्यासह व सर्व कामे करण्यास सोयीचे जाते. नाव नोंदणीसाठी लाभार्थ्यांनी ७० २० ८१ ७३ ६३, ९२ ८४ ६२ ६८ ७७ आणि ८६ ९८ ०६३ २०० या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजक तथा भाजप व्यापारी आघाडीचे महानगराध्यक्ष प्रेमकुमार फेरवानी आणि नांदेड लॉयन्स क्लब एंजल्स यांनी केले आहे

# हदगाव भाजपा तालुकाध्यक्षाला मारहाण

**नांदेड (प्रतिनिधी)** – हदगाव तालुक्यातील वाळकी फाटा येथे ५ ऑगस्ट रोजी सकाळी साडेदहाच्या सुमारास जय केदारनाथ पेट्रोल पंपाजवळ मारहाणीची घटना घडली. साई पिराजी बाभुळकर व त्याच्या इतर सात साथीदारांनी गैरकायद्याची मंडळी जमवून हदगाव भाजपचे तालुकाध्यक्ष नामदेव पारटकर यांना तू तालुकाध्यक्ष पदाचा राजीनामा देतोस का नाही? असे म्हणून पारटकर व त्यांचा भाऊ योगेश यास लोखंडी रॉडने जबर मारहाण केली.

या मारहाणीच्या घटनेत दोघे भाऊ जखमी झाले असून, त्यांच्यावर नांदेड येथील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी नामदेव पारटकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून हदगाव पोलीस ठाण्यात आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक नंद करत आहेत.

# जबरी वाटमारी करणाऱ्या तिघांपैकी एकाला पकडले; दोघे जण फरार

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहराच्या सांगवी परिसरातील आसना बायपास परिसरात वाटमारी करणाऱ्या तिघांपैकी एकाला नागरिकांनीच पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. मात्र दोघेजण पळून जाण्यात यशस्वी ठरले. ही घटना ६ ऑगस्ट रोजी दुपारी दोनच्या सुमारास घडली.

नांदेड शहरातील विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या आसना ओव्हर ब्रिज सर्विस रस्त्यावरून अर्धापूर तालुक्यातील येळेगाव येथील प्रभू केशवराव कपाटे (वय २८) हे पायी जात होते. यावेळी त्यांच्या पाठीमागून दुचाकी क्रमांक (टीएस०२- ईएम-८२४९) वरून आलेल्या अनोळखी तीन चोरट्यांनी त्यांना अडविले. थापडबुक्याने मारहाण करून त्यांच्या खिशातील दहा हजार रुपये किमतीचा ओपो कंपनीचा मोबाईल जबरीने चोरून घेतला आणि तेथून पळ काढल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

यावेळी प्रभू कपाटे यांनी आरडाओरडा केल्याने त्या परिसरात असलेल्या काही लोकांनी पाठलाग करून तिघांपैकी एकाला पकडले. मात्र तो अल्पवयीन असल्याचे सांगण्यात आले. दोघेजण मात्र घटनास्थळावरून पळून जाण्यात यशस्वी ठरले. प्रभू केशवराव कपाटे यांच्या फिर्यादीवरून विमानतळ पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला. तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक जोंधळे हे करत आहेत. पोलिसांनी दुसऱ्याही आरोपीला अटक केली असून, तिसराही आरोपी लवकरच पकडण्यात येईल, असे पोलीस निरीक्षक कामठेवाड यांनी सांगितले.

# सिद्धार्थ बहादूरे यांचे निधन

**हदगाव (प्रतिनिधी)** येथील बौद्ध नगरातील ज्येष्ठ नागरिक नारायण हिरामण बहादूरे



यांचे चिरंजीव सिद्धार्थ नारायण बहादुरे यांचे अल्पशा आजाराने गुरुवार, दि. ७ ऑगस्ट रोजी दुपारी दोनच्या सुमारास निधन झाले.

सिद्धार्थ बहादुरे यांची अंत्ययात्रा बौद्ध नगर येथील त्यांच्या राहत्या घरून निघणार असून, त्यांच्या पार्थिवावर शुक्रवार, दि. ८ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता हदगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

# अवैध वाळू जप्त; माहूर आणि नांदेड ग्रामीण पोलिसांची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यातील माहूर आणि नांदेड ग्रामीण पोलिसांच्या कारवाईत अवैध वाळू व वाहतूक करणारे दोन वाहने जप्त करून चालकांविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत.

जिल्ह्यातील माहूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत सौदागर कॉलनी येथे पोलिसांनी कारवाई करून संतोष चिमणाजी लिंबकर (वय २२ राहणार वडारपुरा तालुका माहूर) हा त्याच्या ताब्यातील विना नंबरचे ट्रॅक्टरमधून पाच हजार रुपये किमतीची एक ब्रास वाळू वाहतूक करीत होता. पोलिसांनी त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून वाळूसह ट्रॅक्टर जप्त केले आहे. अंमलदार बालाजी राठोड यांच्या फिर्यादीवरून संतोष लिंबकरविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक ब्राह्मणे करत आहेत.

दुसऱ्या घटनेत नांदेड तालुक्यातील वाहेगाव शिवारात टाटा हायवा (एमएच २६ बीइ ९९ ८८) मधून अवैध वाळू वाहतूक होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर कारवाई करण्यात आली. ५ ऑगस्ट रोजी रात्री बाराच्या सुमारास वाहेगाव जवळ वरील क्रमांकाचा हायवा ट्रक येताच त्याला पोलिसांनी थांबविले. त्यात २५ हजार रुपये किमतीची पाच ब्रास अवैध वाळू आढळून आली. पोलीस दिसताच वाहन चालक पसार झाला. पोलिसांनी वाळूचा हायवा ट्रक वाळूसह जप्त करून पोलीस हवालदार माधव डफडे यांच्या फिर्यादीवरून अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार पांचाळ करत आहेत.

# जिल्हाधिकाऱ्यांनी केली ई-पीक पाहणी; मुदखेड तालुक्यातील खंबाळा गावाला भेट

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या उपस्थितीत गुरुवारी मुदखेड तालुक्यातील खंबाळा येथे रोजगार हमी योजनेचे अंतर्गत फुलशेतीची पाहणी करण्यात आली. यावेळेस जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी स्वतः ई-पीक पाहणी केली.



जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व शेतकऱ्यांना स्वतःची ई-पीक पाहणी स्वतः करून घ्यावी, असे आवाहन यावेळी केले. याप्रसंगी मुदखेड तालुक्याचे तहसीलदार आनंद देऊळगावकर, गटविकास अधिकारी शेखर देशमुख, संबंधित गावाचे ग्रामपंचायत अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, मंडळाधिकारी, रोजगार हमी योजनेचे अधिकारी आणि संबंधित शेतकरी उपस्थित होते. या पाहणी दौऱ्यात ई-पीक पाहणी करून जिल्हाधिकारी कर्डीले यांनी समाधान व्यक्त केले.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com